रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २६७
www.ramprahar.com

◆ गुरुवार, १६ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## महिला आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांचे 'मिशन एकमत'



**मुंबई :** महिला आरक्षण विधेयकाच्या एकमताने मंजुरीसाठी केंद्र सरकारने कंबर कसली असतानाच महाराष्ट्रातही या विषयावर राजकीय सहमती घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. संसदेच्या १६ ते १८ एप्रिलदरम्यान होणाऱ्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण सुधारणा विधेयक मांडले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व खासदारांसह विविध राजकीय पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांना मुख्यमंत्र्यांनी पत्र लिहून या ऐतिहासिक विधेयकाला एकमताने पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. "महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हे पाऊल उचलले जात असून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे आणि विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा," असे आवाहन या पत्रातून करण्यात आले आहे.

## अंतरंग

दागिन्यांची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक/२
वडखळ येथे ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू/५
आयर्लंड दौऱ्यासाठी वैभव संभाव्य खेळाडूंच्या यादीत/८

# नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढवा : राष्ट्रपती

**नागपूर : प्रतिनिधी**

देशात असलेली ग्रामीण-शहरी आरोग्य तफावत कमी करण्यासाठी एआय, डिजिटल हेल्थ आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर आपण वाढवला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी (दि.१५) केले. त्या नागपूर येथील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस म्हणजेच एम्स येथे द्वितीय दीक्षांत समारंभ सोहळ्यात बोलत होत्या.



या सोहळ्यास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नव्याने वैद्यकीय पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या डॉक्टर्सना राष्ट्रपती मुर्मू यांनी मोलाचा सल्ला दिला. डॉक्टरांसाठी करुणा, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्ये सर्वात महत्त्वाची आहेत. तरुण डॉक्टरांनी आयुष्यभर शिकत राहण्याची आणि संशोधनाची वृत्ती जोपासावी, कारण जिज्ञासा हीच प्रगतीची गुरूकिल्ली आहे, असे राष्ट्रपतींनी सांगितले. वैद्यकीय क्षेत्र मानवतेची सेवा असून त्यास केवळ व्यवसाय मानू नये, रुग्णांसोबतच्या सहानुभूतीपूर्ण संवादामुळे रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना आधार मिळतो, असेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या व्यापक उद्देशाने एम्सचा विस्तार केला, त्या उद्दिष्टपूर्तीकडे नागपूर एम्स यशस्वीपणे वाटचाल करत असल्याचे दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाखाली देशात वैद्यकीय शिक्षणाचा झालेला विस्तार हा एक विक्रम आहे. महाराष्ट्रातही मागील काही वर्षांत १५हून अधिक वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत. यामुळे गरजू व्यक्तींपर्यंत वैद्यकीय सेवेचा लाभ पोहचविणे शक्य होत आहे. राज्यात प्रत्येक नागरिकाला पाच किमीच्या परिघात वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील, असे सक्षम आणि व्यापक जाळे उभारण्याचे काम आम्ही करत आहोत, असेही त्यांनी सांगितले.




## अलिबागमध्ये नारीशक्ती वंदन अधिनियम समर्थनार्थ पदयात्रा

### भाजप महिला मोर्चातर्फे स्वाक्षरीचीही मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या नारीशक्ती वंदन विधेयकाला समर्थन देण्यासाठी भाजप दक्षिण रायगड जिल्हा महिला मोर्चातर्फे बुधवारी (दि. १५) अलिबागमध्ये पदयात्रा काढण्यात आली तसेच स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.

केंद्र सरकारतर्फे लोकसभा व राज्यसभा तसेच राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक मांडण्यात येणार आहे. त्यासाठी १६ एप्रिलपासून संसदेचे विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे. या अधिवेशनात विधेयक मंजूर करण्यात येणार आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास २०२९मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्यात येईल.

या विधेयकाला समर्थन देण्यासाठी भाजप दक्षिण रायगड जिल्हा महिला मोर्चातर्फे अलिबागमध्ये पदयात्रा काढण्यात आली तसेच स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. अलिबाग येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून पदयात्रेला सुरुवात, तर काळंबादेवी मंदिर येथे पदयात्रेची सांगता करण्यात आली. तेथे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.



भाजप दक्षिण रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्ष ॲड. मनस्वी मोहिते यांच्या पुढाकाराने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. भाजप जिल्हा उपाध्यक्ष ॲड. पल्लवी तुळपुळे, पेणच्या नगराध्यक्ष प्रितम पाटील, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य मृणाल खेडकर, अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, भाजप अलिबाग मध्य तालुका अध्यक्ष वृंदा राजगे, अलिबाग उत्तर तालुका अध्यक्ष ऋतुजा पिंगळे, संजीवनी नाईक, शर्मिला पाटील आदी या पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, राजिपचे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील आदी उपस्थित होते.

## माथेरान घाटरस्त्यात बिबट्याचे दर्शन




**माथेरान : प्रतिनिधी**

नेरळ-माथेरान घाटरस्त्यात बिबट्याचे दर्शन झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच वनविभागानेदेखील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

माथेरान-नेरळ मार्गावरील टॅक्सीचालक महेश जाबरे यांना मंगळवारी (दि.१४) रात्रीच्या वेळी घाटरस्त्यालगत असलेल्या कठड्यावर बिबट्या बसलेला दिसला. लागलीच त्यांनी याचे चित्रीकरण करून हा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल करून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.

माथेरान हे एक जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असल्याने येथे पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात. काही पर्यटक तर रात्रीच्या वेळीदेखील प्रवास करतात. त्यामुळे सर्वांनी या ठिकाणी आता सतर्कता बाळगण्याची गरज आहे.

समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या या व्हिडीओमुळे वनविभागानेदेखील नागरिकांना या संपूर्ण परिसरात बिबट्याचा वावर असून कोणीही रात्रीच्या वेळी कॅम्पिंग किंवा तंबू लावणे, आग-शेकोटी पेटवणे, पार्टी करणे अगर फिरणे टाळावे, असे फलक लावण्यात आले आहेत.

## सीबीएसई दहावी परीक्षेचा निकाल जाहीर

### ९३.७० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, मुलींची बाजी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सीबीएसई म्हणजे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदादेखील निकालात मुलींनी मुलांना मागे टाकत बाजी मारली आहे.

सीबीएसईने अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही, मात्र गुणवत्ता प्रमाणपत्र त्या त्या विषयात अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत अपयश आले आहे ते दुसऱ्या परीक्षेसाठी अर्ज दाखल करू शकतात. याशिवाय जे विद्यार्थी पहिल्या परीक्षेत मिळालेल्या गुणांमुळे समाधानी नाहीत, ते १५ मेपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार सीबीएसईने दोन बोर्ड परीक्षा पद्धत आणली आहे.

## निवडक

### अंदमानजवळ समुद्रात जहाज बुडाले; अनेक जण बेपत्ता

**अंदमान :** येथील समुद्रात एक जहाज बुडाल्याची दुर्घटना घडली. यामध्ये जवळपास अडीचशे लोकांचा बुडून मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या जहाजात रोहिंग्या निर्वासित आणि बांगलादेशी नागरिकांचा समावेश होता. दक्षिण बांगलादेशच्या किनाऱ्यावरून निघालेले आणि क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी भरलेले हे जहाज मलेशियाकडे जात होते. खवळलेल्या समुद्रात आणि वेगवान वाऱ्यामध्ये जहाज सापडून उलटल्याचा अंदाज आहे. आतापर्यंत केवळ नऊ जणांना वाचविण्यात आल्याचे वृत्त आहे.

### नगरसेविका सहर शेख यांचे पद धोक्यात

**मुंब्रा :** ठाणे महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर 'कैसे हराया' या वक्तव्यामुळे लक्ष वेधून घेणाऱ्या एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख आता अडचणीत सापडल्या आहेत. त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल तहसीलदार उमेश पाटील यांनी दिला आहे. बनावट कागदपत्रांच्या जोरावर शेख यांनी निवडणूक जिंकली असल्याचा ठपका तक्रारदाराने ठेवला असून चौकशीची मागणी केली आहे.

## नवीन पनवेल येथे भीम जयंती महोत्सव

### लोकगायक आनंद शिंदेंचा बहारदार कार्यक्रम

### आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली उपस्थिती




**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीचे औचित्य साधून नवीन पनवेल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित सहा दिवसीय भीम जयंती महोत्सवाने सध्या संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण केले आहे. या भव्य महोत्सवात मंगळवारी (दि.१५) सायंकाळी सुप्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांचा भीमगीतांच्या बहारदार गायनाचा कार्यक्रम पार पडला. त्यांच्या पहाडी आवाजातील गाण्यांनी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन महामानवाच्या स्मृतीस अभिवादन केले आणि आनंद शिंदे यांच्या गायनाचा आस्वाद घेतला.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनी या महोत्सवाचे नेटके नियोजन केले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सर्वांना डॉ. आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष जिल्हा अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी महापौर तथा विद्यमान नगरसेविका डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, सभागृहनेते तथा कार्यक्रमाचे आयोजक ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक मनोज भुजबळ, गणेश कडू, अजय बहिरा, समीर ठाकूर, शशिकांत शेळके, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, नगरसेविका राजेश्री वावेकर, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, शिवानी घरत, अस्मिता घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्राची जाधव, माजी सदस्य अमित जाधव, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, वर्षा नाईक, दमयंती भोईर, कामगार नेते रवी नाईक, अरुण सोळंकी, अविनाश गायकवाड, राजू गायकवाड, अनिल जाधव, मयुरेश खिस्मतराव, स्वाती बिनेदार, यश बिनेदार यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, भीम अनुयायी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपीच्या घरावर कारवाई

**अमरावती : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील फोटो व व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारित केल्याच्या प्रकरणात अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथील आरोपी अयाज अहमद याच्या घरावर बुधवारी (दि.१५) धडक कारवाई करण्यात आली. त्याच्या घराचा काही भाग अतिक्रमित असल्याने नगर परिषदेने बुलडोजर फिरवला.



अचलपूर नगर परिषदेकडून संबंधित घरावरील अतिक्रमणाबाबत तपास केल्यावर काही भाग बेकायदेशीररित्या बांधण्यात आल्याचे समोर आले होते. त्यानंतर पालिकेने आरोपीच्या कुटुंबाला अतिक्रमणासंदर्भात नोटीसही बजावली होती. त्यानुसार बुधवारी कडक पोलीस बंदोबस्तात कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. भाजपचे आमदार प्रवीण तायडे हेही हजर होते.

### एसआयटी स्थापन

परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) केला जाणार आहे. याबाबत भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी मागणी केली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार यांच्या नेतृत्वात १० पोलीस अधिकारी आणि ३६ अंमलदाराचे विशेष पथक नेमण्यात आले आहे.

## पनवेल मनपातर्फे शनिवारी खारघर हिल महापौर मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने येत्या शनिवारी (दि.१८) खारघर सेंट्रल पार्क येथे भव्य खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन)चे आयोजन करण्यात आले आहे. निसर्गरम्य खारघर हिलच्या सानिध्यात होणाऱ्या या स्पर्धेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.



खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन)चे वैशिष्ट्य म्हणजे खारघर हिलच्या निसर्गरम्य वातावरणामुळे ही मॅरेथॉन धावपटूंसाठी एक वेगळा अनुभव देणारी ठरणार आहे. या माध्यमातून फिटनेसप्रेमींना एकत्र आणण्याचा मानस आहे. नागरिकांमध्ये आरोग्याप्रति जागरूकता निर्माण व्हावी आणि शहरात क्रीडा संस्कृती वाढावी या उद्देशाने ही मॅरेथॉन आयोजित केली जात आहे.

मॅरेथॉन १० आणि पाच किमी अशा दोन गटांमध्ये होणार आहे. १० किमी मॅरेथान सकाळी ५.४५ वाजता, तर पाच किमी मॅरेथॉन सकाळी ७ वाजता सुरू होईल. ज्या नागरिकांना या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपली नोंदणी https://forms.gle/Sk५YLFit२cvL९QD९९ या लिंकवर करून या भव्य क्रीडा सोहळ्याचा भाग व्हावे.

मॅरेथॉनची तारीख अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपली असून नोंदणी प्रक्रियेला नागरिकांनी उदंड प्रतिसाद द्यावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.



### असा आहे मार्ग

**पाच किमीसाठी...**

*सेंट्रल पार्क, इस्कॉन मंदिर, ग्रामविकास भवन, मुंब्रा मेट्रो स्टेशन, मुंब्रा जंक्शन यू टर्न, लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा सेक्टर १९, ग्रामविकास भवन व परत सेंट्रल पार्क.*

**१० किमीसाठी...**

*सेंट्रल पार्क, इस्कॉन मंदिर, ग्रामविकास भवन, मुंब्रा मेट्रो स्टेशन, मुंब्रा जंक्शन यू टर्न, लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा सेक्टर १९, ग्रामविकास भवन, उत्सव चौक, बेलपाडा मेट्रो स्टेशन यू टर्न, उत्सव चौक, गोल्फ कोर्स व परत सेंट्रल पार्क.*

## शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या खेळाडूंची निवड

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमी पुन्हा एकदा गुणवंत खेळाडू घडविण्यात यशस्वी ठरली आहे. अकॅडमीतून प्रशिक्षण घेत असलेल्या काही होतकरू खेळाडूंनी जिल्हा व राज्य स्तरावर आपली दमदार छाप पाडत निवड मिळवली आहे.

अमेय महेंद्र पाटील (टाकीगाव, उरण) याची महाराष्ट्र अंडर-१६ संघात, स्मित सुधीर पाटील (वशेणी, उरण), ओम सचिन म्हात्रे (बोरी, उरण) आणि दक्ष धनेश्वर पाटील (खोपटा, उरण) यांची रायगड अंडर-१९ संघात निवड झाली आहे. त्याचप्रमाणे जिज्ञासा नित्यानंद कडू (न्हावेखाडी, पनवेल) हिने रायगड अंडर-१५ संघात स्थान मिळवून अकॅडमीचा मान उंचावला आहे.

या सर्व यशस्वी खेळाडूंचा गौरव करण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीला भेट दिली. त्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सचिव राजेश पाटील, खजिनदार सुजित ठाकूर, कोच मनोज लोखंडे, सुमित चौहान तसेच अकॅडमीचे विद्यार्थी उपस्थित होते. अकॅडमीच्या या उल्लेखनीय पावलामुळे पनवेल, उरण परिसरातील क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे.



# जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क

## जपानी मेंदूज्वर आजारावर लसीकरण मोहिमेला वेग – मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, : प्रतिनिधी**

जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५–१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

**जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका**

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

**राज्यातील सद्यस्थिती**

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

## चौक बाजारपेठेत नित्याचीच वाहतूक कोंडी; विद्यार्थी, जेष्ठ नागरिक हतबल

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेत नित्याचीच वाहतूक कोंडी झाली असून, आता तिची सवय जडली आहे, असे उपसात्मक बोलले जाते,बेशिस्त चालक, बेशिस्त पार्किंग हेच खरे कारण आहे.

चौक ही सुमारे चाळीस गावची बाजारपेठ आहे. या बाजारपेठेतून तुपगाव मार्गे वाशिवली आणि जांभिवली मार्गे जाण्यास मार्ग असल्याने अनेक गाड्यांची वाहतूक सुरू असते.



चौक बाजार पेठेत बँक,सलून, किराणा दुकाने,हॉटेल, बीअर शॉप, दारूची दुकाने,चिकण,मटण, मच्छी, भाजी,पार्लर, हार्डवेअर, मोबाईल दुकाने,शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, शासकीय कार्यालय, शासकीय रुग्णालय, खागजी रुग्णालय, वैद्यकीय चाचणी अशी अनेक आस्थापने असल्याने नागरिक,विद्यार्थी,ग्राहक, व्यापारी यांची गर्दी असते,

रस्त्याच्या कडेला आणि वळणावर बेशिस्त वाहन पार्किंग होत असल्याने ही कोंडी होत आहे. चौकचे पोलीस हे शर्थीचे प्रयत्न करून वाहतूक कोंडी होणार नाही, याची काळजी घेतात, पण बेशिस्त वाढत चालली असल्याने ही कोंडी कायम राहील. विद्यार्थी, जेष्ठ नागरिक हतबल झाले आहेत.

## एसटी चालकाला मारहाण केल्याप्रकरणी आरोपींना शिक्षा

**माणगाव : प्रतिनिधी**

नागोठणे एस.टी. बस स्टॅण्डचे आवारात ता. ०५ जून २०१९ रोजी एसटी चालकास मारहाण केल्या प्रकरणी आरोपींना माणगावचे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री मुकेश के. पाटील यांनी २ वर्षाची सश्रम कारावास आणि रोख दंडाची शिक्षा सुनावली




सदर घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी दिपक उमाजी खंडागळे, ता. ०५ जून २०१९ रोजी पेण ते पाली, एस.टी. क्र. एमएच ४० एन ८४०१ ही घेवून येत असतांना नागोठणे एस.टी. बस डेपोमध्ये आत जात असतांना आरोपी आखिब आबिद इलामी हा त्यांचे ताब्यातील मोटार सायकल बस चे समोर आणली. त्यामुळे फिर्यादी दिपक खंडागळे यांनी मोटार सायकल बाजूस घेण्यास सांगितल्याने त्याचा राग आरोपी आखिब आबिद इलामी व आदिल सलाम पानसरे यांना राग येवून त्यांनी एस.टी. बस चालक यांस आरोपीत नं. ३ अरमान अब्दुल रशिद मन्सूरी याने एस.टी. चालक दिपक खंडागळे यांस त्यांचे सीटवरून खाली खेचून त्याचे शर्टची बटने तोडून आतील बनियान फाडून फिर्यादीस मारहाण केली.

याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. या गुन्हयाचा तपास श्री एस.एस. करांडे, पोलिस उपनिरीक्षक, नागोठणे पोलिस ठाणे यांनी करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर केसमधील फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपासी अंमलदार यांची साक्ष महत्वाची ठरली. सदर केसमधील आरोपीत यांना वेगवेगळ्या कलमान्वये दोषी ठरवून आरोपींनां२ वर्ष सक्तमजुरी व रू. ७०००/– दंडाची शिक्षा सुनावली.

## दागिन्यांची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विविध भागात चोरी प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. या बाबत नेरळ पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी करताना सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेतले आहे. नेरळ पोलिसांनी पकडलेल्या सराईत गुन्हेगाराकडून तब्बल १२ गुन्ह्यांची उकल केली आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या कारवाईचे कौतुक केले आहे.



महिलांच्या गळयातून सोन्याच्या गंठण,मंगळसूत्र तसेच सोन्याची चैन यांची चोरी करणाऱ्या घटना सातत्याने घडत असतात. कर्जत तालुक्यात अशा असंख्य घटनांची नोंद असून नेरळ पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि आपले खबरी यांचे माध्यमातून सोन्याचे दागिने हिसकावून घेणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेतले आहे. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन आपल्या गुन्हे प्रकटीकरण टीमला सूचना दिल्या. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरणचे उप निरीक्षक सुशील काजरोळकर, तसेच सचिन वाघमारे, राजाभाऊ केकाण, आशु बेंद्रे, विनोद वांगणेकर यांच्या टीमने तांत्रिक माहिती सीसीटीव्ही कॅमेरे आणि खबरी यांच्या माहितीच्या आधारे या प्रकरणी शेलू येथील मध्ये राहणारा ४१ वर्षीय प्रविण पाटील याला ताब्यात घेतले.

## नवी मुंबईतील वाशी येथे बस आणि कारची धडक, चालक जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजता नवी मुंबईतील वाशी परिसरातील अरेन्जा सर्कल येथे बस आणि कारची जोरदार धडक झाली, ज्यात चालक गंभीर जखमी झाला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, बस तुर्भेच्या दिशेने जात होती, तर कार कोपरीहून बेलापूरच्या दिशेने जात होती.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही बाजूंना सिग्नल बदलत होतेएका बाजूचा सिग्नल हिरवा होणार होता, तर दुसऱ्या बाजूचा सिग्नल हिरवा होणार होता. दोन्ही चालकांनी भरधाव वेगाने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे हा अपघात झाला.

धडक इतकी जोरदार होती की बसची पुढची काच फुटली, तर कारचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर लगेचच स्थानिकांनी जखमी चालकाला बाहेर काढून नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात दाखल केले, जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अरेन्जा सर्कल येथे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलीस घटनास्थळी दाखल झाले,

त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि वाहतूक पूर्ववत झाली. प्राथमिक तपासानुसार, अतिवेग आणि सिग्नलकडे दुर्लक्ष करणे ही अपघाताची मुख्य कारणे असल्याचे दिसून येते. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## पालीत डंपरने दोन दुचाकी उडवल्या; जीवितहानी टळली

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात अवजड आणि ओव्हरलोड डंपरचा थरार थांबण्याचे नाव घेत नाही आहे. सोमवारी (ता. १३) रात्री एका बेभान डंपरने येथील आगरआळी जवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक देऊन उडवले. सुदैवाने, या अपघाताच्या वेळी दुचाकींजवळ कोणीही नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



या अपघातात दुचाकींचे मोठे नुकसान झाले आहे. पाली शहरात गेल्या काही महिन्यांपासून डंपरमुळे होणाऱ्या अपघातांचे सत्र सुरूच आहे. यापूर्वी फेब्रुवारी महिन्यात महावितरणचे कर्मचारी अनंत सोनवणे यांना एका भरधाव डंपरने पाठीमागून धडक दिली होती. सोनवणे यांनी प्रसंगावधान राखून गाडीवरून उडी मारल्याने त्यांचे प्राण वाचले, मात्र त्यांच्या कंबरेला गंभीर दुखापत झाली होती. त्या घटनेत मुजोर डंपर चालकाने पळून जाण्याचा प्रयत्न केला होता, ज्याला भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे आणि नागरिकांनी पाठलाग करून पोलिसांच्या ताब्यात दिले होते.

**ठराव अंमलबजावणीच्या प्रतीक्षेत**

नागरिकांच्या तक्रारीनंतर पाली नगरपंचायतीने २६ फेब्रुवारी रोजी ठराव क्र. १९७ मंजूर केला होता. यानुसार शहरातून सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन कार्यवाहीची मागणी करण्यात आली होती, मात्र अद्याप जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्याही सूचना प्राप्त न झाल्याने किंवा नगरपंचायतीने अंमलबजावणी न केल्याने हा ठराव केवळ कागदावरच राहिला.

**या ओव्हरलोड डंपर वहातुकीमुळे शाळकरी विद्यार्थी, पालक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. अवजड वाहतूक थांबावी व निर्बंध लागावे यासाठी नगरपंचायतीला सह्यांचे निवेदन दिले होते, मात्र कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाने ही ओव्हरलोड वाहतूक तातडीने बंद करावी, अन्यथा सामान्य पालीकर रस्त्यावर उतरतील.**

**–श्रीकांत ठोंबरे,** अध्यक्ष, भाजप, सुधागड तालुका

## 'विहिंप'चे अखिल भारतीय सत्संग प्रमुख दादा वेदक यांनी केले दत्ताजी मसुरकरांचे सांत्वन

**खोपोली: प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सत्संग प्रमुख दादा वेदक यांनी आज खोपोलीत माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे प्रदेश नेते दत्ताजीराव मसुरकर यांचे सांत्वन केले. मसूरकर यांचे बंधू मनोहर मसुरकर यांचे नुकतेच निधन झाले आहे या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद व संघ परिवारातर्फे मसूरकर कुटुंबांचे सांत्वन करण्यात आले यावेळी रा स्व संघ चे सहकार्यवाह अविनाश मोरे,विश्व हिंदू परिषदेचे रुपेश मिस्त्री, रवींद्र जैन, भावेश लोखंडे, सुहास कुंभार, अशोक घोसाळकर व इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी दादा वेदक यांनी सत्संग सादर केला सर्वांनी यात सहभाग घेतला.





**खोपोली : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी महामानवाच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. त्याचप्रमाणे मिरवणुकीत सहभाग घेतला. सोबत इतर.**

## बंद केलेल्या एसटी बस पूर्ववत सुरू करण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका डोंगराळ दुर्गम असून दळणवळणाची सोय असलेल्या एस टी गाड्या करोना पासून बंद करण्यात आल्या आहेत.त्या गाड्या पुन्हा सुरु करण्याची मागणी सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी संघटनेने केली आहे

तळा पुणे, तळा ठाणे नालासोपारा म्हसळा तळा वस्ती ची बस नियमितपणे चालणाऱ्या या बस कोरोना संसर्ग, एस टी संपाचे कारण काढून बंद केल्या.आजपर्यंत वेळोवेळी निवेदने देऊनही प्रशासन सुस्त असल्याचे दिसून येत आहे.

घाटमाथ्यावरील प्रवाशांना तळा पुणे शिवाय पर्याय नाही. शासकीय कर्मचारी, प्रवासी, जेष्ठ नागरिक,कर्मचारी, शालेय विद्यार्थी, महीला व पर्यटनासाठी मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन, अशा ठिकाणी येणारे पर्यटक .या सर्व प्रवाशांना इंदापूर माणगांव किंवा रोहा येथे जाऊन प्रवास करावा लागतो वेळप्रसंगी उभ्याने प्रवास करावा लागत आहे.

सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी संघटनेने तीन महिन्यापुर्वी लेखी मागणी करुन ही एकही बस सुरु केली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण झाला आहे.

## सारडे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील सारडे गावचे सेवानिवृत्त माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक ए.डी.पाटील व त्यांच्या अर्धांगिनी निवृत्त शिक्षिका भारती पाटील या दांपत्यांच्या लग्नाचा ५१वा वाढदिवस सारडे येथील प्राथमिक शाळेतील, पहिली ते सातवीच्या एकूण ६८ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून, अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी गावातील निवृत्त शिक्षका अहिल्या रघुनाथ म्हात्रे व निवृत्त शिक्षक सदानंद अंबाजी पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.



याशिवाय अपूर्वा घरत, रश्मी पवार व सौ.म्हात्रे या शिक्षिकांचा देखील ए. डी.पाटील व भारती पाटील यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पिरकोन हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक एल.एन.भगत यांनी भूषविले होते. तर प्रमुख पाहुणे ॲड. हिरामण पाटील, सरपंच रोशन पाटील, चेअरमन विनायक म्हात्रे व जेष्ठ नागरिक रामदास पाटील होते.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त महावितरणकडून रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन महावितरण यांच्या वतीने खारघर येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला अभियंत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण ५० अभियंत्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समानता, बंधुता आणि मानवतेच्या विचारांना अनुसरून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी रक्ताचा तुटवडा भासत असल्याने, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संघटनेने हा उपक्रम राबवला. "रक्तदान करताना जात, धर्म किंवा भाषेचा कोणताही अडसर नसतो; हेच बाबासाहेबांच्या विचारांचे खरे आचरण आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला. महावितरण ही केवळ अभियंत्यांची संघटना नसून, जात–पात व धर्माच्या पलीकडे जाऊन सातत्याने सामाजिक कार्य करणारी संघटना म्हणून ओळखली जाते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निवडक

### पनवेलमधून स्कूटीची चोरी

**पनवेल :** शहरातील सप्तगीरी बार जवळ सर्विस रोडला उघड्यावर उभी करून ठेवलेली हिरो होंडा कंपनीची सफेद रंगाची ॲक्टिव्हा स्कुटी गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. रुचिता शेटे यांची ४५,००० रुपये किमतीची हिरो होंडा कंपनीची सफेद रंगाची ॲक्टिव्हा स्कुटी गाडी (एमएच ४६ बीटी ४९७२) ही उभी करून ठेवली होती. याचवेळी अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाहनाच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल** : अज्ञात वाहनाच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील चिंचपाडा ब्रिज (कळंबोली सर्कल ते चिंचपाडाकडे जाताना) येथे घडली आहे. या ठिकाणी रस्त्याचे मध्यभागी एक व्यक्ती (वय अंदाजे ५५ ते ६०) हे बेशुध्द अवस्थेत पडलेले होते. त्यांना कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने ठोकर मारल्याने त्यांचा चेहरा रक्ताने भरलेला दिसत होता. त्यांना एमजीएम हॉस्पीटल कामोठे येथे पुढील उपचारा करीता रवाना केले असता त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोन्याच्या बांगड्यांची चोरी

**पनवेल :** घरातून दोन तोळ्याच्या सोन्याच्या चार बांगड्यांची चोरी झाल्याची घटना तालुक्यातील बालाजी सिम्फनी, सुकापुर येथे घडली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी यांची मैत्रीण शितल कश्यप या त्यांच्या घरी सुकापुर येथे आले असताना फिर्यादी त्यांच्या मुलीला स्कूल व्हॅनमध्ये बसवण्यासाठी घराच्या बाहेर गेल्या. त्या घरी परत आल्यानंतर बेडरूममध्ये ठेवलेल्या तिजोरीच्या ड्रॉवरमध्ये पाहिले त्यावेळेस चावी तशीच होती आणि सोन्याच्या बांगड्या नव्हत्या. त्यांनी बांगड्यांचा घरात शोध घेतला, मात्र बांगड्या सापडल्या नाहीत.

### महागड्या कपड्यांची चोरी

**पनवेल :** महागड्या लिनन कंपनीच्या पँट व शर्टची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. शहरातील निलेशकुमार राजपुरोहित यांच्या वसंत रुतु सीएचएस शॉप न. ५ येथील दुकानात ठेवलेल्या लिनन कंपनीच्या महागड्या पँट व शर्ट ज्याची किंमत जवळपास ५९०१० रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तहसील कार्यालयात भीम जयंती



**पनवेल :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात तहसील कार्यालय, पनवेल येथे मिनल भामरे–भोसले तहसीलदार पनवेल यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. कार्यक्रमात बाळू रजाने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते.

### स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे वाटप

**पनवेल :** दूंदरे ग्रुप ग्रामपंचायत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने सिद्धार्थ नगर रिटघर येथील नागरिकांना स्पर्धा परीक्षा पुस्तके वाटप करणेत आली. तसेच ग्रामपंचायत दूंदरे हद्दीतील सर्व शाळा व अंगणवाड्याना कूलरचे वाटप करणेत आले. यावेळी सरपंच सुभाष भोपी, सदस्य विश्वास पाटील, शांताराम चौधरी, माजी सरपंच भारत भोपी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



# जनगणना प्रक्रियेसाठी पनवेल महापालिका सज्ज

## प्रशिक्षणांतर्गत फील्ड ट्रेनर्सची क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत जनगणना २०२७ च्या तयारीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून फील्ड ट्रेनर्स यांची क्षेत्रभेट आज दि. १५ एप्रिल २०२६ रोजी यशस्वीरित्या पार पडली. या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष जनगणना प्रक्रियेचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.



ही क्षेत्रभेट पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व जनगणना उपायुक्त अभिषेक पराडकर यांच्या नियोजनानुसार झाली. या क्षेत्रभेटीच्या वेळी सांख्यिकी अधिकारी तथा जनगणना विभागप्रमुख रविना येवले व अधिक्षक नामदेव पिचड हे उपस्थित होते.

क्षेत्रभेट काळण समाज हॉल, वाल्मिकीनगर परिसरात आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जनगणना विभागप्रमुख व अधीक्षकांनी सर्व फील्ड ट्रेनर्सना मार्गदर्शन केले. त्यांनी जनगणना कार्यातील अचूकता, जबाबदारी व शिस्त यांचे महत्त्व अधोरेखित केले. क्षेत्रभेटीमध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४५ फील्ड ट्रेनर्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी ६० कुटुंबाचे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण करण्यात आले.

यावेळी फील्डवरील विविध परिस्थिती हाताळण्याचे तंत्र, नागरिकांशी संवाद कौशल्ये तसेच तांत्रिक अडचणींचे निराकरण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सर्व फील्ड ट्रेनर्सनी मोबाईल ॲपद्वारे प्रत्यक्ष डेटा एंट्री करून अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी फिल्ड ट्रेनर वैभव पाटील यांनी सर्व फिल्ड ट्रेनर्स, अधिकारी वर्ग व वाल्मिकी नगर वसाहतीतील नागरिकांचे आभार मानले.

**डिजिटल जनगणनेचे प्रात्यक्षिक**

जनगणना २०२७ ही पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविण्यात येत असल्यामुळे या क्षेत्रभेटीत मोबाईल ॲपच्या माध्यमातून डेटा संकलन, घर यादी (House Listing) तयार करणे, माहितीची अचूक नोंदणी व पडताळणी (Validation) यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन घरांची माहिती नोंदविण्याचा सराव (Mock Enumeration) केला.

> **या क्षेत्रभेटीमुळे फील्ड ट्रेनर्स अधिक आत्मविश्वासाने व सक्षमतेने पुढील टप्प्यात पर्यवेक्षक व प्रगणकांना प्रशिक्षण देण्यासाठी सज्ज झाले आहेत. जनगणना २०२७ च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**
> **–अभिषेक पराडकर, उपायुक्त, पनवेल मनपा**

## उरण तालुक्यात डॉ. आंबेडकर जयंती

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती यंदा सालाबाद प्रमाणे १४ एप्रिल २०२६ रोजी उरणमध्ये उत्साहात साजरी झाली आहे. राष्ट्रीय महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रतिमेस मान्यवरांनी वंदन केले.

यानंतर मागासवर्गीय समाजासह इतर समाजातील नागरिकांसह अध्यक्ष संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिरवणूक सिद्धार्थनगर बौद्धवाडा मोरा येथून उरण नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालोद्यान येथे येऊन परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी दिनेश गायकवाड, संतोष मोघे, संघर्ष नगर मांगीर देव, खलील शेख आदींसह सिद्धार्थनगर मोरा, संघर्षनगर भवरा, मांगीरदेव, बौद्धवाडा, चारफाटा, एनजीएल गेट भीम नगर, सावित्री बाई फुले, नाईक नगर तसेच उरण तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पनवेल लोकमान्य नगर येथे भीमजयंती थाटामाटात साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती लोकमान्य नगर रेल्वे स्टेशन रोड पनवेल येथे थाटामाटात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, ॲड. शिवानी घरत तसेच भाजप ज्येष्ठ नेते जगदीश घरत, प्रभाग क्रमांक १७ अध्यक्ष विजय म्हात्रे, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, अशोक आंबेकर, शक्ती केंद्र प्रमुख राजू बगाटे, जरीना शेख आणि तथागत मित्र मंडळाचे कार्यकर्ते व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खारघर येथे ग्रंथ प्रदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय खारघर येथे बुधवारी (दि.१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने ग्रंथालय समिती मार्फत भव्य ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमांचे उदघाटन लाल फित कापून महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी केले. ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रमाचे हेतू तसेच ग्रंथाचे जीवनातील महत्त्व विविध उदाहरणे सांगून कथन केले. ते पुढे बोलताना म्हणाले की, आंबेडकर यांचे वाचन अफाट आणि प्रगाढ होते. वाचनामुळे आंबेडकर जागतिक कीर्तीचे महामानव झाले. कार्यक्रम हा वाचनकक्ष ग्रंथालय विभाग येथे पार पडला. सदर कार्यक्रमास ग्रंथालय समिती सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन आणि आभार ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी केले. पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

## पनवेलमध्ये आज स्वामी समर्थ पालखी सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

अक्कलकोट निवासी स्वामी समर्थ महाराज यांच्या पालखी परिक्रमा सोहळ्याचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. १६ एप्रिल रोजी गावदेवीपाडा येथील स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे हा सोहळा उत्साहात होणार आहे.

प. पू. सदूरू नाना महाराज परांजपे यांच्या कृपाशीर्वादाने आयोजित या उत्सवात श्री स्वामी समर्थांच्या पादुका दर्शन आणि पालखी परिक्रमा मुख्य आकर्षण असणार आहे. पालखीचे आगमन गुरुवारी सायंकाळी ठिक ४ वाजता होणार असून, त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मठातून पालखी परिक्रमा पनवेल शहरात मार्गस्थ होईल. या सोहळ्याचे आयोजन श्री श्री १०८ श्री महंत मठाधिपती सुधाकरदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

वारकरी बोधनाच्या माध्यमातून संतांच्या वाणीचा प्रसार व्हावा आणि भाविकांना आध्यात्मिक व श्रवण सुखाचा लाभ मिळावा, हा या दिंडी सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे.



**खालापूर : भक्ती वेदांत गौआश्रम चारिटेबल ट्रस्ट नानिवली श्री राधाकृष्ण मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार महेश बालदी, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे आदी उपस्थात होते. मंदिराच्या मदतीसाठी एक लाख रुपये देणगी देण्यात आली. यावेळी जे. एम. म्हात्रे यांचे संस्थेकडून आभार मानण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक दिनेश महाराज, अध्यक्ष अनंता महाराज पाटील, तानाजी खंडागळे, रविंद्र गायकवाड, गजानन लोगडे, सचिन मते आदी उपस्थित होते.**

## अनधिकृत बाजार, फेरीवाल्यांवर मनपाची कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील अनधिकृत बाजारांवर व अतिक्रमणाच्या विरोधात जोरदार कारवाई सुरू आहे. दरम्यान १४ एप्रिल रोजी तळोजा फेज ३ अनधिकृत आठवडा बाजार व दैनंदिन बाजारांविरोधात व्यापक स्वरूपात अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली.

उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या सुचनेनूसार प्रभाग अ चे सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी प्रभाग अधिक्षक मनोज चव्हाण यांनी अनधिकृत आठवडे बाजारासाठी आलेल्या फेरीवाले, हातगाड्यांवर तोडक कारवाई करून आठवडा बाजार बंद केले. तसेच प्रभाग समिती क कामोठेचे सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या सूचनेनूसार सेक्टर ११ येथे संपूर्ण फुटपाथवर अनधिकृत फेरीवाले बसले असता, त्यांच्यावरती प्रभारी अधिक्षक दशरथ भंडारी यांनी अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या साह्याने तोडक कारवाई केली. यावेळी फेरीवाल्यांचा सर्व माल जप्त करून दहा हातगाड्या जप्त करण्यात आल्या.



**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते विश्वास म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## आरटीएस परीक्षेत लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था,सातारा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी नेहमीच विविध शैक्षणिक उपक्रम राबवत असते. भविष्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्याच्या उद्देशाने संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत प्रत्येक वर्गांसाठी विविध शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा व प्रवेश परीक्षा घेतल्या जात आहे. यामध्ये इयत्ता सातवी साठी रयत टॅलेंट सर्च ही शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते.



रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयातील इयत्ता सातवी मधील कुमार कृष्णा नवीन तुपे यांची लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिष्यवृत्ती साठी संस्था स्तरावर निवड झाल्याबद्दल विद्यालयाचे स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी साहेब, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे व त्याचा पालकांचा विद्यालयाकडून सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यालयातील आरटीएस परीक्षा प्रमुख पाटील डी. डी. गावंड सर, पाटील एस. डी., अनिल पाटील, गणेश गलांडे, पेरवी सर, म्हसकर सर उपस्थित होते. अशाच प्रकारे इतर सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून विद्यालयाचे नाव लौकिक करावे ही आशा जयदास गोवारी यांनी व्यक्त केली तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

## खारघर, कळंबोली, पनवेल येथे अभिनय प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १९ मे असे नऊ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात नाट्यकलावंतांना अभिनयाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे त्याकरिता महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या अभिनय प्रशिक्षणचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल महापालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखेच्या विद्यमाने पनवेल, कळंबोली व खारघर येथे सर्व कलावंतांसाठी शिबिर मोफत आहे.

अभिनय प्रशिक्षण शिबिरासाठी दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. यात पहिला गट विभाग म्हणजे वय वर्षे ८ ते १६ हा युवा गट व प्रौढ गट म्हणजे १७ ते ६० वयांपर्यंत यात सहभाग घेता येईल, प्रत्येक गटासाठी हे शिबीर पूर्णपणे मोफत आहे. संख्या मर्यादेमुळे प्रथम येणाऱ्या ३०–३० नाट्यकर्मींना या शिबिरासाठी प्रवेश दिला जाईल.

युवा गटासाठी सकाळी ९ ते १२ व प्रौढ गटासाठी दुपारी २ ते ५ अशी वेळा असतील. त्याचप्रमाणे पनवेल आणि खारघर येथे एक बॅच ही उच्चस्तरीय अभिनय प्रशिक्षणासाठी असेल. या शिबिरासाठी आपली नाव नोंदणी ५ मे २०२६ पर्यंत करावी, असे आवाहन पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्यावतीने करण्यात येत आहे.

शिबिरात सहभागी होण्यासाठी शामनाथ पुंडे– प्रमुख कार्यवाह– अ.भा.नाट्य परिषद, पनवेल शाखा. ९८२१७५८१४७, स्मिता गांधी,सह कार्यवाह– अ.भा.नाट्य परिषद, पनवेल शाखा. ९३२३४८९६९३, वर्षा कुलकर्णी जनसंपर्क अधिकारी ७७१५८१५१२७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

> **पनवेल महानगरपालिका हद्दीतील नाट्य कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळावे व त्यांमधून पनवेलचे नाव राज्यात सर्वत्र पोहचावे याकरिता नाट्य परिषद विविध उपक्रम सातत्याने राबवित असते. सध्या सुट्टीचे दिवस असल्याने युवा नाट्यकर्मींना अभिनय प्रशिक्षणास वेळ मिळु शकतो. या अभिनय प्रशिक्षण शिबिराचा मोठा फायदा पनवेलमधील कलावंतांना होईल, असे परिषदेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी म्हटले आहे.**
> **–परेश ठाकूर, उपाध्यक्ष,**
> अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, महापालिका सदस्य

## संपादकीय

# संकटातील संधीचा शोध!

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहील असा अंदाज हवामान खात्याने वर्तविल्याने, दुष्काळ, पाणीटंचाई, महागाई अशी संकटेही समोर उभी राहण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत, तात्पुरत्या उपाययोजना करून वेळ मारून नेण्याऐवजी कायमस्वरूपी योजनांची आखणी हे आव्हान ठरणार आहे. मोदी सरकारने त्यादृष्टीने केलेल्या योजना म्हणजे, संकटातून साधलेली संधी ठरणार आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेची कणा मानली जाणारी शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनच्या लहरीपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर, महागाईवर आणि सामाजिक स्थैर्यावरही उमटतो. त्यामुळेच, अल निनो हा भारतासाठी नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून कमकुवत होण्याची शक्यता असल्याने सहाजिकच, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा व जलसंकट यांसारख्या समस्या डोके वर काढू शकतात, हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने केलेल्या उपाययोजना पाहता, 'अल निनो' हे संकट नव्हे, तर भविष्यातील संकटापासून कायमस्वरूपी तोडगा काढणारी संधी ठरेल, हे स्पष्ट दिसत आहे. 'अल निनो'मुळे वातावरण बदलाचा परिणाम भारतात जाणवतो, तेव्हा मान्सूनचा पाऊस अपुरा राहण्याची शक्यता असते. अल निनोच्या प्रभावामुळेच १९७२, १९८७, २००२ आणि २००९ ही वर्षे भारतात दुष्काळासाठी कुप्रसिद्ध ठरली. २००२ च्या दुष्काळाचा तर देशातील अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम झाला आणि आर्थिक वाढीचा वेगही मंदावला. अल निनोचा सर्वाधिक फटका कृषी क्षेत्राला बसतो. पाऊस कमी पडल्यास पिकांचे उत्पादन घटते, बाजारात तुटवडा निर्माण होतो आणि महागाई वाढते. पाणीटंचाई वाढते, वीज मागणी वाढते, आणि आरोग्याच्या समस्याही सुरू होतात. ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढते, ज्यामुळे शहरी पायाभूत सुविधांवर अतिरिक्त दबाव येतो. त्यामुळे अल निनो हा केवळ हवामानशास्त्रीय मुद्दा नसून तो आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याशी निगडित आहे. पूर्वी अल निनो म्हणजे हमखास दुष्काळ असे मानले जात असे. परंतु आज हा संबंध तितका सरळ राहिलेला नाही. यामुळे हवामानाचा अंदाज बांधणे अधिक क्लिष्ट झाले आहे. त्यामुळे,अनिश्चिततेशी जुळवून घेणे हे भारतासमोरील मोठे आव्हान असून त्या दिशेने सरकारने उचललेली पावले परिणामकारक ठरणार आहेत. शेतकऱ्यांना केवळ पावसावर अवलंबून राहावे लागू नये यासाठी पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करण्याबरोबरच, पाण्याचा कार्यक्षम वापर, शेतीतील तंत्रज्ञानाचा प्रसार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या मजबुतीकरणावर भर दिला जात आहे. 'अल निनो'मुळे या वर्षी सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज असल्याने केंद्रातील मोदी सरकारने शेती, जलसंधारण आणि महागाई नियंत्रणावर लक्ष केंद्रित केले आहे. कमी पाण्यात येणाऱ्या आणि उष्णता सहन करणाऱ्या बाजरी, कडधान्ये, सोयाबीन अशा पिकांच्या वाणांना प्रोत्साहन दिले जात आहे, तर पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा देण्यासाठी विमा कवच अधिक मजबूत करण्यात आले आहे. 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने'द्वारे सूक्ष्म सिंचन क्षेत्राचा विस्तार करण्यावर भर देऊन जलाशयांमधील पाणीसाठ्याच्या वापराचे नियोजन करण्यात येत आहे. जुन्या विहिरींचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मोहिमा राबवल्या जात आहेत, आणि महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी अन्नधान्याचा राखीव साठा वाढविला जात आहे. थोडक्यात, 'कमी पाऊस' गृहीत धरून केवळ आपत्कालीन मदतच नाही, तर दीर्घकालीन पायाभूत सुविधा वाढविण्याच्या योजनांमुळे देशासमोरील संभाव्य संकट हे कायमच्या उपाययोजना आखण्याची संधी ठरणार असल्याने मोदी सरकारला धन्यवाद द्यावयास हवेत.**

# पोलादपूर शहराचा घनकचरा विषय गहन





**खबरबात**
**शैलेश पालकर**

नगरपंचायत पोलादपूर राज्यातील तालुक्याच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याच्या वटहुकूमाने कार्यरत झाली आहे. मात्र, तत्पूर्वी स्थानिक पत्रकार शैलेश पालकर यांनी पूर्वीच्या ग्रुपग्रामपंचायत क्षेत्रातील गावे आणि वाड्यांचा समावेश करून नगरपंचायतीची निर्मिती करण्याची मागणी शासनाकडे लावून धरली होती. तसे झाले असते तर पोलादपूरसोबत चरई, काटेतळी, चोळई, रानबाजिरे, लोहारे आणि मोरगिरी गावांचा समावेश होऊन नगरपंचायतीचा क्षेत्रविस्तार झाला असता. यामुळे पोलादपूर शहराची गावठाण विस्ताराची समस्या दूर होऊन विविध उपक्रमांसाठी आवश्यक जमिनींची उपलब्धता सुकर झाली असती, मात्र घाईघाईने झालेल्या नगरपंचायतीमुळे जमिनीची कमतरता आणि सेवांची अनुपलब्धता वाढीस लागली आहे. ग्रामपंचायत असताना ग्रामविकास खात्याकडे आणि नगरविकास खात्याकडे निधीची अपेक्षा असलेल्या पोलादपूरच्या सत्ताधाऱ्यांना सध्या घरपट्टीवाढीशिवाय उत्पन्नाचा दुसरा पर्याय दिसून येत नाही. यापुर्वी नगरपंचायत पोलादपूरला डम्पिंग ग्राऊंडसाठी जमिन उपलब्ध करण्यासंदर्भात अनेकवेळा जाहिराती देऊनही कचरा कोणीही स्विकारत नसल्याचा अनुभव घ्यावा लागला.

नगरपंचायत पोलादपूरकडून उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्रामध्ये शहरातील कचरा गोळा करून टाकण्याचे काम बिनबोभाटपणे सुरू असून अशाप्रकारच्या कृतीमुळे नगरपंचायतीला यापूर्वी हरित लवादाकडून ७ लाख रूपयांचा दंड ठोठावला होता. पोलादपूर नगरपंचायतीने कचरा गोळा करून सावित्री नदीपात्रात टाकण्याकामी तब्बल ७९ लाखांची निविदा प्रक्रिया सुरू केली असल्याची माहिती चर्चेत असून अशाप्रकारे नदीपात्रात कचरा टाकण्याला विरोध असल्याचे पत्र नगरपंचायतीचे विरोधी गटनेता दिलीप भागवत यांनी दिले आहे. गेल्या काही वर्षांपासून उत्तर वाहिनी सावित्री नदी आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गास समांतर असलेल्या चिखलीचा डोह या चरई फाटयालगतच्या जुना महाबळेश्वर रस्त्याच्या समोरील विस्तारित पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल परिसरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामपंचायतीचा आणि त्यानंतर नगरपंचायतीचाही डंम्पींग झोन अस्तित्वात होता. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात हा डंम्पींग झोन जॅकवेलचा परिसर आवश्यक असल्याने भूसंपादित झाल्याने उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्राजवळील स्मशानभूमीलगतच्या मोकळया जागेत डंम्पींग ग्राऊंड तयार करण्यात आले आहे.

पोलादपूर शहरातील विविध रस्त्यांवरून कचरा वाहून नेणाऱ्या घंटागाडया स्वच्छतेची गाणी वाजवित सकाळी कचरा गोळा करून स्मशानभूमीलगतच्या डंम्पींग ग्राऊंडवर रिकाम्या केल्या जात आहेत. सरकारी नियमानुसार नदीपात्रापासून १०० मीटर्स आणि महामार्गापासून २०० मीटर्स क्षेत्रामध्ये डंम्पींग ग्राऊंड तयार करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, मात्र ग्रामपंचायत आणि आताची नगरपंचायत यांच्याकडे कोणताही पर्याय नसल्याने या मोकळया जागेतच कचरा गोळा केला जात आहे.

सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या या डंम्पींग ग्राऊंडला पर्याय शोधण्यासाठी पोलादपूर नगरपंचायतीचे तत्कालीन नगराध्यक्ष निलेश सुतार, तत्कालीन उपनगराध्यक्ष सिध्देश शेठ आणि सत्ताधारी नगरसेवक व विषयसमिती सभापतींनी सावंतकोंड, पार्टेकोंड आणि चोळई या लगतच्या गावांतील जमीनमालकांकडे सरकारी निकषानुसार १५-२० गुंठयांची जमीन मिळविण्यासाठी चर्चा केली. याकामी रेडीरेक्नरनुसार साधारणपणे २०-२३ हजार रूपये प्रतिगुंठा जमिनीचा भाव दिल्यास जमीनमालक सौदा करण्यास तयार झाले नाहीत तर बाजारभाव आणि भूसंपादनाचा भाव या डंम्पींग ग्राऊंडच्या जमिनीसाठी देणे नगरपंचायतीला शक्य नसल्याने रायगड जिल्हाधिकारी कार्यालयानेच याकामी सहकार्य केल्यास नगरपंचायत सदर जमिनीची किंमत अदा करेल, अशी भूमिका घेतली नगरपंचायतीने त्यावेळी घेतली होती.

'नदीला पूर आलेला....' पाहिला की पाण्यातील जैवविधतेला अपायाची तमा न बाळगता मानवी वस्त्यांना होऊ घातलेला आरोग्याचा धोका टाळण्यासाठी डंम्पींग ग्राऊंडवरील कचरा नदीपात्रात जेसीबीने लोटण्याचा एकमेव पर्याय अंमलात आणणारी नगरपंचायत पोलादपूर आता 'नदीला पूर येवो न येवो...' नदीपात्रात कचरा लोटत आहे. याबाबत पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधीगटनेता नगरसेवक दिलीप भागवत यांनी प्रभारी मुख्याधिकारी यांना पत्र लिहून ओला कचरा व सुका कचरा व्यवस्थापन न करता सावित्री नदीपात्रामध्ये कचरा टाकण्याचा प्रकार न थांबल्यास १५ दिवसांत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

यापूर्वी पोलादपूर नगरपंचायतीने कचरा गोळा करून सावित्री नदीपात्रात टाकण्याकामी तब्बल ७९ लाखांची निविदा प्रक्रिया सुरू केली असल्याचा उहापोह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे विधानसभा निवडणूकीच्या प्रचारसभेमध्ये करण्यात माजी नगराध्यक्ष निलेश सुतार यांच्याकडून करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीचे गटनेता दिलीप भागवत यांनी दिलेल्या पत्रानुसार नगरपंचायतीने सावित्री नदीपात्रामध्ये गाळ टाकणे थांबविले नाही तर या पक्षाकडून आंदोलनाचा पवित्रा घेतला जाण्याची चिन्हे दिसून येत आहेत. कचरा गोळा करणाऱ्या ठेकेदाराकडून कमी कर्मचारी कामावर ठेऊन अधिक कर्मचारी संख्या ठेवल्याचा मोबदला देताना नगरपंचायतीकडून हजेरी व कामावर लक्ष ठेवले जाते अथवा कसे याबाबत प्रश्न निर्माण झाला असून विरोधी पक्षनेत्यांच्या पत्रामुळे अनेक गोष्टीत वाचा बंद होण्याची वेळ ओढवणार आहे. गेल्या काही वर्षांपासून उत्तर वाहिनी सावित्री नदी आणि मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गास समांतर असलेल्या चिखलीचा डोह या चरई फाटयालगतच्या जुना महाबळेश्वर रस्त्याच्या समोरील विस्तारित पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल परिसरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामपंचायतीचा आणि त्यानंतर नगरपंचायतीचाही डंम्पींग झोन अस्तित्वात होता. आता पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर लेप्रसी मिशन हॉस्पिटलसमोरील सावित्री नदीपात्राजवळ मोठया प्रमाणात डम्पिंग केले जात असल्याने मोकाट गायी गुरांना अन्नाच्या शोधात प्लास्टीक पिशव्यादेखील खाव्या लागल्याने त्यांची पोटं एकाबाजूने मोठी झालेली दिसून येत आहे. यापुर्वी केवळ बातम्यांद्वारे विरोध केला जात असताना पोलादपूर तालुक्यातील 'आमची माती आमची माणसं' संघटना आक्रमकपणे नदीपात्रात कचरा टाकण्याच्या विरोधात कार्यरत झाली आहे. यामुळे कचरा दूर होईल अथवा कसे याबाबत राजकीय इच्छाशक्तीच निर्णायक ठरणार आहे. तूर्तास, घनकचरा व्यवस्थापनाचा विषय पोलादपूर शहरासाठी गहन होऊ पाहात असल्याचेच चित्र दिसून येत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### रेडमीचा बजेट स्मार्टफोन A७ प्रो भारतात लॉन्च

शाओमीचासब-ब्रँड रेडमीने सोमवारी भारतात आपला नवीन ५G स्मार्टफोन रेडमी A७ प्रो लॉन्च केला आहे. बजेट सेगमेंटमधील हा फोन मोठ्या बॅटरीसह आणि लेटेस्ट गूगल जेमिनी (Gemini) आणि सर्कल टू सर्च (Circle to Search) AI फीचर्ससह सादर करण्यात आला आहे.यात ६.९ इंच डिस्प्ले, ६३००mAh बॅटरी आणि १३MP कॅमेरा मिळेल. फोन दोन व्हेरिएंटमध्ये सादर करण्यात आला आहे.



रेडमीचा हा फोन मॉडर्न डिझाइनसह येतो. यात तीन कलर- ब्लॅक, मिस्ट ब्लू आणि सनसेट ऑरेंजचे पर्याय उपलब्ध आहेत.

मटेरियल आणि फीलः फोनचा मागील पॅनल प्लास्टिक (पॉलीकार्बोनेट) पासून बनलेला आहे, परंतु त्याला प्रीमियम फिनिश देण्यात आले आहे. हातात धरल्यावर तो खूप मजबूत आणि हलका वाटतो.

डिस्प्ले डिझाइनः समोर ६.९ इंचाची मोठी स्क्रीन दिली आहे. यात पातळ बेझल्स आहेत आणि सेल्फी कॅमेऱ्यासाठी वॉटरड्रॉप नॉच स्टाइलचा वापर केला आहे.


IP५२ रेटिंगः फोनला पाण्याची हलकी फवारणी आणि धुळीपासून वाचवण्यासाठी IP५२ रेटिंग देण्यात आले आहे.

स्पेसिफिकेशन्सः मोठी स्क्रीन आणि नवीनतम ऑपरेटिंग सिस्टम

डिस्प्लेः यात ६.९ इंचाची HD+ LCD स्क्रीन आहे. स्मूथ व्हिज्युअलसाठी १२०Hz चा रिफ्रेश रेट आणि कडक उन्हात स्क्रीन स्पष्ट दिसण्यासाठी ८०० निट्सची पीक ब्राइटनेस दिली आहे. हे डोळ्यांच्या संरक्षणासाठी ब्लू लाइट सर्टिफाइड आहे. कॅमेराः फोटोग्राफीसाठी मागील पॅनलवर १३ मेगापिक्सलचा मुख्य AI कॅमेरा आणि LED फ्लॅश देण्यात आला आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी ८ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा मिळतो.

बॅटरी आणि चार्जिंगः यात ६३००mAhची मोठी बॅटरी आहे जी १५W फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते. यात ७.५W ची रिव्हर्स चार्जिंग तंत्रज्ञान देखील आहे, ज्यामुळे तुम्ही तुमचा दुसरा फोन किंवा ईयरबड्स देखील चार्ज करू शकता.

# अभिनेता, दिग्दर्शक चार्ली चॅपलिन



**निमित्त**


सर चार्ल्स स्पेन्सर चॅप्लिन हा एक इंग्रजी कॉमिक अभिनेता, चित्रपट निर्माता आणि संगीतकार होता, जो मूक चित्रपटाच्या युगात प्रसिद्ध झाला. तो त्याच्या स्क्रीन व्यक्तिरेखेद्वारे, ट्रॅम्पद्वारे जगभरात एक आयकॉन बनला आणि चित्रपट उद्योगातील सर्वात महत्वाच्या व्यक्तींपैकी एक मानला जातो. त्याची कारकीर्द ७५ वर्षांहून अधिक काळ, व्हिक्टोरियन युगातील बालपणापासून ते १९७७मध्ये त्याच्या मृत्यूच्या एक वर्षापूर्वीपर्यंत आणि त्यात प्रशंसा आणि विवाद दोन्ही समाविष्ट आहेत.


लंडनमधील चॅप्लिनचे बालपण गरिबी आणि कष्टमय होते. त्याचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी झाला. त्याचे वडील अनुपस्थित होते आणि त्याची आई आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत होती. त्याला नवव्या वयाच्या आधी दोनदा वर्कहाऊसमध्ये पाठवण्यात आले होते. जेव्हा तो १४ वर्षांचा होता तेव्हा त्याची आई मानसिक आश्रयासाठी वचनबद्ध होती. चॅप्लिनने लहान वयातच परफॉर्म करण्यास सुरुवात केली. म्युझिक हॉलमध्ये फेरफटका मारला आणि नंतर स्टेज अभिनेता आणि कॉमेडियन म्हणून काम केले. १९व्या वर्षी, त्याला फ्रेड कार्नो कंपनीशी करारबद्ध केले गेले, जे त्याला युनायटेड स्टेट्सला घेऊन गेले. त्यांना चित्रपट उद्योगासाठी शोधण्यात आले आणि कीस्टोन स्टुडिओसाठी १९१४मध्ये ते दिसू लागले. त्याने लवकरच ट्रॅम्प व्यक्तिमत्त्व विकसित केले आणि मोठ्या चाहत्यांना आकर्षित केले. त्याने स्वतःचे चित्रपट दिग्दर्शित केले आणि एस्साने, म्युच्युअल आणि फर्स्ट नॅशनल कॉर्पोरेशनमध्ये गेल्यावर त्याने आपली कला आणखी वाढवत राहिली. १९१८पर्यंत ते जगातील सर्वात प्रसिद्ध व्यक्तींपैकी एक होते.

१९१९मध्ये चॅप्लिनने युनायटेड आर्टिस्ट्स या वितरण कंपनीची सह-स्थापना केली. ज्याने त्यांना त्यांच्या चित्रपटांवर पूर्ण नियंत्रण दिले. द किड, त्यानंतर अ वुमन ऑफ पॅरिस, द गोल्ड रश आणि द सर्कस हा त्यांचा पहिला वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट होता. त्यांनी सुरुवातीला १९३०च्या दशकात ध्वनी चित्रपटांकडे जाण्यास नकार दिला, त्याऐवजी सिटी लाइट्स आणि मॉडर्न टाईम्स संवादाशिवाय तयार केले. द ग्रेट डिक्टेटर हा त्याचा पहिला ध्वनी चित्रपट होता, ज्याने डॉल्फ हिटलरवर व्यंगचित्र केले होते. १९४०चे दशक चॅप्लिनसाठी वादग्रस्त ठरले आणि त्याची लोकप्रियता झपाट्याने कमी झाली. त्याच्यावर कम्युनिस्ट सहानुभूती असल्याचा आरोप होता तसेच पितृत्वाच्या दाव्यात आणि तरुण स्त्रियांशी लग्न केल्याबद्दल प्रेस आणि लोकांच्या काही सदस्यांना बदनाम केले गेले. एफबीआयचा तपास उघडण्यात आला आणि चॅप्लिनला अमेरिका सोडून स्वित्झर्लंडमध्ये स्थायिक होण्यास भाग पाडले गेले. त्याने त्याच्या नंतरच्या चित्रपटांमध्ये ट्रॅम्पचा त्याग केला, ज्यात मॉन्सियर वर्डॉक्स, लाइमलाइट, अ किंग इन न्यूयॉर्कचा समावेश आहे.

चॅप्लिनने त्यांच्या बहुतेक चित्रपटांचे लेखन, दिग्दर्शन, निर्मिती, संपादन, अभिनय, आणि संगीत दिले. तो एक परिपूर्णतावादी होता आणि त्याच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे त्याला चित्राच्या विकासावर आणि निर्मितीवर अनेक वर्षे घालवता आली. वैशिष्ट्यीकृत आहेत. त्यांचा २५ डिसेंबर १९७७ रोजी मृत्यू झाला. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

### मुलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढतेय..!

पूर्वी, ४० वर्षांपेक्षा जास्२ वयाच्या लोकांना हृदयविकाराचा धोका होता, परंतु आता लहान मुलांनाही अचानक हृदयविकाराचा झटका येणे किंवा अचानक हृदय थांबणे ही चिंतेची बाब बनत चालली आहे.

मुलांमध्ये हृदयरोगाची कारणे प्रौढांपेक्षा थोडी वेगळी असतात.दोन सर्वात मोठी कारणेआजकाल, अन्नात पोषणाचा अभाव, जास्त चरबीयुक्त आणि तळलेले पदार्थ खाणे आणि जास्त जंक फूड खाणे यामुळे मुलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. याशिवाय, शारीरिक हालचालींचा अभाव हे देखील एक मोठे कारण आहे.मुले त्यांचा बहुतेक वेळ स्क्रीनसमोर घालवतात, ज्यामुळे त्यांची शारीरिक हालचाल कमी होत आहे. लठ्ठपणा वाढत आहे आणि त्याचा थेट परिणाम हृदयावर होत आहे. मुलांमध्ये लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि मधुमेह यासारख्या समस्या हळूहळू वाढत आहेत, ज्यामुळे हृदयरोग होऊ शकतात.मुलांमध्ये हृदयविकाराच्या झटक्यामागे अनेक कारणे असू शकतात, त्यापैकी काही जन्मजात असतात तर काही जीवनशैलीशी संबंधित असतात-हायपरट्रॉफिक कार्डिओमायोपॅथी...यामध्ये हृदयाचे स्नायू असामान्यपणे जाड होतात, ज्यामुळे हृदयाचे ठोके खूप वेगवान होऊ शकतात आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. ही अनुवांशिक समस्या असू शकते..चॅनेलोपॅथी...शरीरातील सोडियम आणि पोटॅशियम सारख्या इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखणाऱ्या वाहिन्यांमधील अडथळे अनियमित हृदयाचे ठोके निर्माण करू शकतात.



यामुळे हृदयाचे ठोके खूप जलद किंवा खूप मंद होऊ शकतात, ज्यामुळेजीवघेण्या परिस्थिती उद्भवू शकतात.रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा...हृदयाच्या धमन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

प्रौढांमध्ये हे सहसा कोलेस्टेरॉलच्या साठ्यामुळे होते, तर मुलांमध्ये ते धमन्यांच्या विकासातील असामान्यतांमुळे होऊ शकते.जन्मजात हृदय दोष...काही मुले जन्मतःच हृदयात छिद्र घेऊन जन्माला येतात किंवा त्यांच्या रक्तवाहिन्या असामान्यपणे विकसित होतात, ज्यामुळे भविष्यात हृदयाच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.अल्कापा सिंड्रोम...यामध्ये, हृदयाची मुख्य धमनी महाधमनीऐवजी फुफ्फुसीय धमनीपासून उद्भवते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

# माणगाव बाजारटेप मोहल्ला येथील सामाजिक सभागृहाचे खासदार तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत माणगाव नगरपंचायत प्रभाग क्र.१७ मधील बाजारटेप मुस्लिम मोहल्ला येथील सामाजिक सभागृह बांधणे या कामाचा भूमिपूजन समारंभ सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ रोजी रायगड – रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना खा.तटकरे यांनी शहरातील विकासकामांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत चालना दिली जाईल, अशी ग्वाही दिली.



या कार्यक्रमाप्रसंगी प्रसार माध्यमांजवळ बोलताना खा.सुनील तटकरे पुढे म्हणाले गेली ३५ ते ४० वर्षाच्या माझ्या राजकीय जीवनात मला माणगावकरांनी भरपूर आशीर्वाद व प्रेम दिले आहे. माणगावकरांचे हे ऋण मी कदापी विसरणार नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे.

पक्षाच्या माध्यमातून शहरातील विविध विकासाची कामे आपण मार्गी लावली आहेत. याची जाणीव ठेवत माणगावकरांनी नेहमीच विकासकामे करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला वेगवेगळ्या निवडणुकांच्या माध्यमातून साथ दिली आहे. त्यातूनच शहराच्या विकास कामांना हातभार लागतो आहे. यापुढेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपण माणगावकर जी – जी कामे सुचवाल ती सर्व कामे पूर्ण केली जातील असेही त्यांनी यावेळी आश्वासित केले.

या सामाजिक सभागृहाच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे कोकण प्रवक्ते अॅड.राजीव साबळे,जेष्ठ नेते सिराज परदेशी,माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव,नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे,उपनगराध्यक्ष रिया उभारे,जिल्हा राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रवींद्र मोरे,नगरसेवक दिनेश रातवडकर,सामाजिक कार्यकर्ते अकबर परदेशी,जमाल पिलपिले आदींसह बाजारटेप मोहल्ला येथील ग्रामस्थ तसेच प्रभाग क्र.१७ मधील ग्रामस्थ,राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एनएचएम अंतर्गत कार्यरत डॉक्टरांचे मानधन थकित

### माणगाव उपजिल्हा रुग्णालयात काम बंद आंदोलनाचा इशारा

**माणगाव : प्रतिनिधी**




माणगाव उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी विशेषज्ञ डॉक्टरांचे मानधन अनेक महिन्यांपासून थकित असल्याने आरोग्य यंत्रणेत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास येत्या १७ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संबंधित डॉक्टरांनी दिला आहे.

भूलतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, शल्यचिकित्सक, अस्थिरोगतज्ञ तसेच फिजिशियन अशा विविध विशेषज्ञ शाखांतील डॉक्टर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात NHM अंतर्गत कंत्राटी पद्धतीने पूर्णवेळ सेवा बजावत आहेत. मात्र, नोव्हेंबर २०२५ पासून त्यांचे मानधन प्रलंबित असून वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ते मिळालेले नाही. डॉक्टरांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकदा प्रयत्न करूनही थकीत मानधनाबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. काही डॉक्टरांचे तर ऑगस्ट २०२५ पासून मानधन थकलेले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या परिस्थितीमुळे डॉक्टर आर्थिकअडचणीत सापडले आहेत. या संदर्भात सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना निवेदन देत संबंधित डॉक्टरांनी स्वतः लक्ष घालून तत्काळ मानधन अदा करण्याची मागणी केली आहे. अन्यथा सर्व विशेषज्ञ डॉक्टरांना कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

## खालापूर येथे उद्या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग यांच्याकडील पत्रानुसार जिल्हयातील विविध स्तरावरील स्वयंसेवक, विद्यार्थी,नागरिकांना पूर विमोचन व दरड कोसळणे या आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम घेण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पुणे यांच्या माध्यमातून Familiarization exercise programचे आयोजन करण्यात आले आहे.

या एकदिवसीय प्रशिक्षणासाठी खालापूर तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी,कर्मचारी, गाव पोलीस पाटील, नागरी संरक्षण दल, होमगार्ड, एनसीसी, एनसीसी विद्यार्थी, ट्रेकर्स ग्रुप, रेस्क्यू टिम,आपदा मित्र, ग्रामस्तरीय लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करुन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पुणे हे खालापूर तालुक्यात १७ एप्रिलला येणार असल्याने प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम प्रशासकीय भवन येथे १७ एप्रिल रोजी आयोजित केले आहे. यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले आहे.

## पेणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक





**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कमिटीच्या वतीने अध्यक्ष तथा सभापती आनंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती. चित्ररथही काढण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने बौद्ध बांधव या मिरवणुकीत सामील झाले होते.

लहान मुलांपासून ते महिला, पुरुष यांनी बाबासाहेबांच्या गीतांवर व डीजेच्या तालावर जल्लोष साजरा केला. हि मिरवणूक पेण बुद्धनगर येथून निघून गांधी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्गे, खाटीक आळी, पं. का पाटील चौक, राजू पोटे मार्ग पेण नाका अशी नेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ या मिरवणुकीची सांगता झाली.

यानिमित्त ध्वजवंदन, बुध्दवंदनाचे कार्यक्रम झाले. यावेळी मुस्लिम बांधवाच्या वतीने मिरवणुकीत सामील बौद्ध बांधवांना पाण्याचे वाटप करण्यात आले. तसेच पेण खाटीक आळीत नगरसेविका आफ्रिन अखवारे यांच्या वतीने शीतपेय व मिठाईचे वाटप करण्यात आले.

## घोडीवली आदिवासीवाडी येथून एक जण बेपत्ता

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे जि. रायगड मनुष्य मिसिंग नं.०६/२०२६ नुसार मारूती लक्ष्मण वाघमारे वय–५५ वर्षे रा. घोडीवली आदीवासीवाडी ता. खालापुर जि. रायगड हे बेपत्ता झाले असून त्यांचा तपास पोलीस करीत आहेत.

२१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारासते घरातून निघून गेले आहेत.दिनांक २४/०१/२०२६ रोजी हरवल्याची नोंद करण्यात आली आहे.मिसिंग व्यक्तीचे वर्णन उंची–०५ फुट, रंग काळा – सावळा, केस पांढरे, चेहरा गोल, नाक–सरळ, अगांने मध्यम, अंगात पांढ–या रंगाचा शर्ट व लाल रंगाची हाफ पॅन्ट, सफेद रंगाचा टॉवेल कमरेला बांधलेला, उजव्या पायाचे तळव्या जवळ सफेद डाग अशा वर्णनाचे आहेत. कुणास आढळल्यास

तपास अंमलदार मो. नं. ८८०५३९५०९०, खालापुर पो. ठाणे ०२१९२२७५०३३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आव ाहन खालापूर पोलीस ठाण्यातून करण्यात आले आहे.

## केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**म्हसळा : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम पार पडला.





कार्यक्रमाची सुरुवात संचालक मंडळाचे सदस्य सुनिल उमरोटकर व संचालक प्रा.रायप्पा माशाले यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व पूजन करून करण्यात आली. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे,सचिव अशोक काते, ग्रंथपाल उदय करडे,लिपीक सायली चोगले तसेच अनुष्का म्हात्रे उपस्थित होते

प्रा.रायप्पा माशाले यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यप्रणालीचा आढावा घेत त्यांच्या साहित्य,वाङमयीन चळवळी आणि भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून देशाला दिलेल्या दिशादर्शक योगदानाची सखोल माहिती दिली.तसेच कोकणाशी असलेल्या त्यांच्या ऋणानुबंधांचा उल्लेख करत त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याला विशेष सलाम व्यक्त केला.

या निमित्ताने वाचनालयात वाचकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित विविध ग्रंथांचे आकर्षक प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते.ग्रंथ प्रदर्शनात खास करून भारताची राज्यघटना,भारताचे संविधान, आपले संविधान,डॉ.भिमराव रामजी आंबेडकर खंड १ ते १० खंड,गाथा भिमरावांची,महामानव डॉ.आंबेडकर,'भारतीय घटनेचे शिल्पकार,माझी आत्म कथा, धम्म चक्रप्रवर्तक ज्ञान योगी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङःमय आदी ग्रंथ प्रदर्शनात ठेवली होती.

कार्यक्रमाला उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून बाबासाहेबांना आदरांजली अर्पण केली

## वडखळ–अलिबाग मार्गावर ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ – अलिबाग मार्गावर झालेल्या एका भीषण अपघातात मुंबईतील एका ५३ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भरधाव ट्रेलरने स्कुटीला दिलेल्या जोरदार धडकेमुळे हा अपघात घडला असून, या घटनेने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दिनेश चंद्रकांत धुमाळ (वय ५३, रा. मजगाव, मुंबई) हे रविवार १२ एप्रिल रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास आपल्या सुझुकी बर्गमॅन स्कुटी क्र. एम एच ०१ एफ सी.३४७२ ने अलिबागच्या दिशेने जात होते. वडखळ येथील संजीवनी हॉस्पिटलसमोर आले असता, पाठीमागून येणाऱ्या ट्रेलर क्र.जी जे – ३९टीबी ५१७४ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, धुमाळ हे थेट ट्रेलरच्या मागील चाकाखाली फेकले गेले. गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला


__जाहीर नोटीस__

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आमचे आशिल माझे क्लायंट श्री. स्वप्नील भीमराव कांबळे, राहणार–अंबरनाथ, ठाणे–421501 हे खाली नमूद मालमत्तेबाबत व्यवहार (खरेदी विक्री/हक्क हस्तांतरण) करण्याच्या तयारीत आहेत.

__मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:__

गावः शिवकर, तालुका: पनवेल, जिल्हा: रायगड, गट क्रमांक: 12/2/ब,

भू–धारणा पद्धतीः भोगवटादार वर्ग–2, शेताचे स्थानिक नावः सदर मालमत्ता ही गाव नमुना 7/12 उताऱ्यानुसार संबंधित धारकाच्या नावे नोंद आहे. भूरीबाई केशव गावडे, अंबाजी धंबा ढवळे, संतोष हसू (उर्फ भुराजी) तरे, पुनम सुयोग पाटील, महादेव धंबा ढवळे, प्रवीण बाळाराम ढवळे, ताराबाई काना पाटील, अमर बलराम ढवळे, कांचन बाळाराम ढवळे, पांडुरंग धंबा ढवळे, अंजना हासू (उर्फ भुराजी) तरे.

वरील नमूद मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक , वित्तीय संस्था, वारस, भाडेकरू किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचा हक्क, दावा, तारण, चार्ज, गहाण, वाद किंवा कोणताही स्वारस्य हक्क असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 21 (एकवीस) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, वरील मालमत्ता कोणत्याही बोजा दाव्यापासून मुक्त असल्याचे गृहित धरून व्यवहार पूर्ण करण्यात येईल व नंतर येणारे कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दिनांक : 15/04/26
ठिकाण: पनवेल
पत्ता: शॉप नं. 01, सिटीलाईट सीएचएस, एलटीडी, प्लॉट नं. 58/A, सेक्टर–21, कामोठे, नवी मुंबई–410209.

सही/–
अॅड. अविनाश गायकवाड
अॅडव्होकेट हायकोर्ट
संपर्क: 9769116322


## खोपोली शहर व परिसरात भीम जयंती जल्लोषात साजरी

**खोपोलीः प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती खोपोली शहर व परिसरात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



१३ एप्रिल रोजी समाज मंदिर रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ मध्यरात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात भिम अनुयायांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर दिवसभर परिसरातील विविध भागातून दलित बांधवांनी मोठ्या मिरवणुका काढून डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, विविध समितीचे सभापती व नगरसेवक नगरसेविकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास त्याचप्रमाणे शिळफाटा येतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्ण कृती पुतळ्यास पुष्पहर घालून अभिवादन केले.

समाजमंदिर येथील स्मारकाजवळ मोठ्या प्रमाणात दलित बांधवांनी त्याचप्रमाणे विविध समाजातील लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले.

दरम्यान, सायंकाळी विहारी येथून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते, या निवडणुकीत खोपोली शहर त्याचप्रमाणे खालापूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात भीम अनुयायांनी प्रचंड गर्दी केली होती. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, महिला व बालकल्याण सभापती सुवर्णा मोरे,त्याचप्रमाणे विविध समिती सभापती व नगरसेवक नगरसेविका, त्याचप्रमाणे माझी उपनगराध्यक्ष मोहन अवसरमन, फुले शाहू आंबेडकर समितीचे श्याम कांबळे, कैलाश गायकवाड, रवींद्र रोकडे, इत्यादी विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविला. रात्री उशिरापर्यंत खोपोली बाजारपेठ व परिसरातून मिरवणुक काढण्यात आली,खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन हिरे व पोलीस पथकाने बंदोबस्त ठेवला होता.

## भाजयुमो अलिबाग तालुका सरचिटणीसपदी आदित्य जैन

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील अॅड. आदित्य जैन यांची अलिबाग तालुका भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी नुकतेच नियुक्तीपत्र जैन यांना दिले.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील आणि जिल्हा सरचिटणीस सतीश धारप यांच्या मार्गदर्शनाखाली अभिप्रेत असलेले संघटन बनवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेवून पक्ष मजबुतीसाठी काम करण्याची अपेक्षा या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my clients **ANAAHAT ENTERPRISE through its Partner 1) Ms. Leena Haritsinh Gohil & 2) Mr. Mukesh Karman Arethia,** registered office address Plot No. 33, Sector 2, Ulwe, Navi Mumbai., has purchased 499.84 Sq.mtrs. of plot bearing no. Plot No. 60, Sector 54, Dronagiri Node, from **M/S Dev Enterprise through Proprietor Mr. Bhanaji Deva Bera,**

***SCHEDULE OF PLOT***

| Node Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| Dronagiri | 60 | 54 | 499.84 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction / sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

***Date 09.04.2026***
***Place - Panvel***

**sd/-**
**Mr. Pankaj V. Mandhare**
**Advocate**

*Flat No 1107, 11 Floor, Building No. 12, Ananta Tower, Plot No 2, Sector 6, Ulwe, Panvel 410206 Mob. 9702416111 adv.pankajmandhare@gmail.com*



__जाहीर नोटीस__

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. स्वप्नील भीमराव कांबळे राहणार अंबरनाथ, ठाणे 421501 हे खाली नमूद मालमत्तेबाबत व्यवहार (खरेदी विक्री/हक्क हस्तांतरण) करण्याच्या तयारीत आहेत.

__मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:__

गावः शिवकर, तालुका: पनवेल, जिल्हा: रायगड, गट क्रमांक: 78/3,

भू–धारणा पद्धतीः भोगवटादार वर्ग–1, शेताचे स्थानिक नावः आवळे (जसे नोंद आहे) सदर मालमत्ता ही गाव नमुना 7/12 उताऱ्यानुसार संबंधित धारकाच्या नावे नोंद आहे. भूरीबाई केशव गावडे, अंबाजी धंबा ढवळे, संतोष हसू (उर्फ भुराजी) तरे, पुनम सुयोग पाटील, महादेव धंबा ढवळे, प्रवीण बाळाराम ढवळे, ताराबाई काना पाटील, अमर बलराम ढवळे, कांचन बाळाराम ढवळे, पांडुरंग धंबा ढवळे, अंजना हासू (उर्फ भुराजी) तरे.

वरील नमूद मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक , वित्तीय संस्था, वारस, भाडेकरू किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचा हक्क, दावा, तारण, चार्ज, गहाण, वाद किंवा कोणताही स्वारस्य हक्क असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 21 (एकवीस) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, वरील मालमत्ता कोणत्याही बोजा दाव्यापासून मुक्त असल्याचे गृहित धरून व्यवहार पूर्ण करण्यात येईल व नंतर येणारे कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दिनांक : 15/04/26
ठिकाण: पनवेल
पत्ता: शॉप नं. 01, सिटीलाईट सीएचएस, एलटीडी, प्लॉट नं. 58/A, सेक्टर–21, कामोठे, नवी मुंबई–410209.

सही/–
अॅड. अविनाश गायकवाड
अॅडव्होकेट हायकोर्ट
संपर्क: 9769116322

# महिला सक्षमीकरणाला अधिक गती द्यावी

## महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे यांचे निवेदन

## प्रशिक्षण ते बाजारपेठपर्यंत संपूर्ण साखळी उभारण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी समिती सदस्यांसह महिलांच्या सर्वांगीण आर्थिक सक्षमीकरणासाठी एक व्यापक आणि धोरणात्मक प्रस्ताव महापौर व आयुक्त यांच्याकडे सादर केला.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर करून महिलांना स्वावलंबी, उद्योजक व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा या प्रस्तावाचा मुख्य उद्देश आहे.

या प्रस्तावामध्ये राष्ट्रीय शहरी आजीविका अभियान (NULM), राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (NRLM), प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया अभियान तसेच महाराष्ट्र शासनाच्या MAVIM धोरणांचा आधार घेत महिलांसाठी प्रशिक्षण, उत्पादन, विक्री व बाजारपेठ या संपूर्ण साखळीचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी नमूद केले की, महानगरपालिकेमार्फत महिला प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जात असली तरी प्रशिक्षणानंतर उत्पादन निर्मिती, गुणवत्ता नियंत्रण, ब्रँडिंग व विक्री व्यवस्थापन या टप्प्यांमध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळत नाही आणि अपेक्षित आर्थिक सक्षमीकरण पूर्णत्वास जात नाही.



या पार्श्वभूमीवर महिलांना "प्रशिक्षण ते थेट ग्राहक" असा सक्षम मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी खालील ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

महिला उत्पादित वस्तूंसाठी अधिकृत विक्री स्टॉल उपलब्ध करणे : पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील उद्यानांच्या बाहेरील अनधिकृत टपऱ्या हटवून संबंधित प्रभागातील महिला व महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थ व इतर उत्पादनांच्या विक्रीसाठी अधिकृत स्टॉल उपलब्ध करून देण्यात यावेत. यामुळे महिलांना थेट ग्राहक मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

प्रभागनिहाय महिला आठवडा बाजार सुरू करणे : महानगरपालिका व सिडकोच्या आरक्षित जागांवर नियमित आठवडा बाजार आयोजित करून त्यामध्ये महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करून द्यावेत. यामुळे महिलांच्या उत्पादनांना स्थिर, नियमित आणि विश्वासार्ह बाजारपेठ उपलब्ध होईल.

कौशल्य विकास, प्रशिक्षण व उत्पादन सुविधा उपलब्ध करणे : महिलांना विविध प्रकारची उत्पादने तयार करण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करण्यासाठी नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत. तसेच प्रशिक्षणानंतर उत्पादनांची प्रत्यक्ष निर्मिती करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री, यंत्रणा व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. कायमस्वरूपी व्यापारी ग्राहक पेठ उभारणे : महिला व महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी वर्षभर चालणारी कायमस्वरूपी व्यापारी ग्राहक पेठ उभारण्यात यावी.

> **भारतीय जनता पक्षाच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या तत्वज्ञानातून महिला सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे. महिलांना केवळ प्रशिक्षण देणे पुरेसे नाही, तर त्यांना बाजारपेठ, संधी आणि आर्थिक बळ देणे अत्यावश्यक आहे. पनवेलमध्ये महिलांसाठी सक्षम आर्थिक परिसंस्था उभारण्यासाठी हा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा आणि दूरदृष्टीपूर्ण आहे.**
> **-प्रितम म्हात्रे,** माजी विरोधी पक्षनेते

**भाजप विचारधारेचा ठसा**

या प्रस्तावामध्ये भारतीय जनता पक्षाच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणांना अनुसरून "आर्थिक स्वावलंबन हीच खरी सबलीकरणाची किल्ली" या विचाराला प्राधान्य देण्यात आले आहे.

# रायगड जि.प.अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्यामुळे शिक्षकांना मिळाला न्याय



**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी पुन्हा एकदा आपल्या संवेदनशील आणि धडाकेबाज कार्यपद्धतीचा परिचय दिला आहे. 'पवित्र पोर्टल'द्वारे नियुक्ती झालेल्या पण भाषेच्या तांत्रिक अडचणींमुळे मानसिक आणि शैक्षणिक कोंडीत सापडलेल्या शिक्षकांना वाकडीकर यांनी मोठा दिलासा दिला असून तब्बल दहा शिक्षकांना न्याय मिळाला आहे.मंगेश वाडीकर यांच्या एका ऐतिहासिक निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

सन २०२४मध्ये पवित्र पोर्टलद्वारे सेमी-इंग्रजी माध्यमासाठी १० शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती, मात्र तांत्रिक कारणांमुळे या मराठी भाषिक शिक्षकांची नियुक्ती उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये झाली होती. मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या या शिक्षकांना उर्दू भाषा येत नसल्याने विद्यार्थ्यांना शिकवताना प्रचंड अडचणी येत होत्या. भाषेच्या भिंतीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आणि शाळांमधील सहशालेय उपक्रमांवरही याचा विपरीत परिणाम होत होता.

गणपतीसारख्या हिंदू सणांच्या सुट्ट्या न मिळणे किंवा उर्दू भाषिक पालकांशी संवाद साधताना या शिक्षकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या गंभीर विषयाबाबत या दहा शिक्षकांनी आपली व्यथा अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या समोर मांडल्यानंतर त्यांनी तातडीने दखल घेऊन त्यांनी केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीवर भर दिला.

या विषयावर रा.जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) नेहा भोसले आणि शिक्षणाधिकारी यांच्यासोबत तातडीने चर्चा केली. १३ एप्रिल २०२६ रोजी संबंधित शिक्षकांना बोलावून, शासन नियमांच्या अधीन राहून त्यांचे मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये समायोजन करण्याचे आदेश दिले.

महाराष्ट्रात अशा प्रकारे तांत्रिक अडचण दूर करून शिक्षकांचे हित जपणारा हा पहिलाच 'ऐतिहासिक निर्णय' असल्याचे मानले जात आहे. शिक्षकांना हा न्याय मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करून रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## सिडकोच्या चार अग्निशामकांचा राष्ट्रीय स्तरावर पुरस्काराने गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळातील चार अग्निशामक कर्मचाऱ्यांना यंदाच्या अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त डायरेक्टर जनरल फायर सर्व्हिस यांचा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सिडकोच्या या यशामुळे संपूर्ण अग्निशमन विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुरस्कार प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अग्निशामक नितीन कीर्तने, गोविंद गडगे, कैलास शिरसाट आणि संभाजी पाटील यांचा समावेश आहे. त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि उत्कृष्ट सेवेमुळे त्यांची निवड करण्यात आली आहे.

या यशामागे माननीय व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे आणि मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या योग्य नेतृत्वामुळेच कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरी करता आली, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्रातून एकूण २९ जणांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला असून, त्यात सिडकोच्या चार कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने महामंडळासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

या सन्मानामुळे सिडकोच्या अग्निशमन विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावले असून, भविष्यात अधिक जोमाने आणि तत्परतेने सेवा देण्याची प्रेरणा मिळाली आहे.

## लिमये वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील के.गो. सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली.

सर्वप्रथम वाचनालयाच्या अध्यक्ष सुनीता जोशी यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर सदस्य काशिनाथ जाधव यांनी बाबासाहेबांविषयीची स्वरचित कविता सादर केली. सदस्य राजकुमार ताकमोगे यांनी बाबासाहेबांच्या वाचन व्यासंगाबद्दल सांगितले.



सदस्य रोहिदास पोटे यांनी बाबासाहेबांच्या कार्याबद्दल मौलिक माहिती दिली.

कार्यक्रमावेळी उपाध्यक्ष बी. पी.म्हात्रे, सदस्य हिमालिनी कुलकर्णी, ग्रंथपाल निकिता शिंदे यांचेसोबत ज्येष्ठ समाजसेवक मुस्ताक ओकये उपस्थित होते.

## राज्यस्तरीय मंथन परीक्षेत हर्ष म्हात्रे उरण तालुक्यात प्रथम

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाले येथील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी हर्ष शेखर म्हात्रे याने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला असून, रायगड जिल्ह्यात १९वा आणि महाराष्ट्र राज्यात २४व्या रँकमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने राज्य पातळीवर चमकदार कामगिरी केल्यामुळे शाळेच्या व गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



या यशाचे श्रेय त्यांनी मार्गदर्शक प्रशांत कोळी, चैताली म्हात्रे या गुरुजनांना दिले आहे. या शिक्षकांनी घेतलेली मेहनत, नियमित सराव आणि कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळे हे हर्षला यश प्राप्त झाले आहे. अशी प्रतिक्रिया हर्षच्या पालकांनी व्यक्त केली.या यशाबद्दल मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी हर्षसह या दोन्ही मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## शालेय आणि स्वच्छता साहित्याचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चा, नवीन पनवेल यांच्या वतीने सील आश्रमातील अनाथ बालकांसोबत एक मनापासूनचा उपक्रम राबवला शालेय साहित्य व स्वच्छता साहित्याचे वाटप करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर ह्यांच्या प्रेरणेने, आमदार प्रशांत ठाकूर ह्यांच्या मार्गदर्शनाने, नगरसेवक परेश ठाकूर, भाजप उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी व महापौर नितीन भाई पाटील ह्यांच्या सहाकार्यने हा उपक्रम राबविण्यात आला. नगरसेवक सुमीत झुंजारराव, संतोश शेट्टी, समीर ठाकूर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित दादा जाधव, प्रवीण सावंत खजिनदारः- उ.रा.जि.अनुसूचित जाती मोर्चा भाजप, भाजप युवा नेते किशोर चौतमल व रुपेश नागवेकर ह्यांच्या साथीमुळे आणि भाजप युवा नेते मयुर अशोक शेळके ह्यांचे संकल्पनतून हा उपक्रम साकार झाला.

ही फक्त मदत नव्हे, तर त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. त्या निरागस चेहऱ्यांवरील आनंद आणि आत्मविश्वास पाहून, डॉ. बाबासाहेबांचे विचार पुन्हा जिवंत झाल्यासारखे वाटले.

## सर्व कामगिरी निर्देशांकांमध्ये जेएनपीएची उत्कृष्ट कामगिरी

**उरण : बातमीदार, वार्ताहर, प्रतिनिधी**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवरही प्रमुख कार्यप्रदर्शन निर्देशांक कायम राखत उल्लेखनीय कार्यक्षमता दर्शविली आहे. जागतिक पुरवठा साखळ्या अजूनही अनिश्चिततेचा सामना करत असताना, जेएनपीएने पूर्वतयारी, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि भागधारकांशी घनिष्ठ समन्वय यांच्या माध्यमातून बंदरातील कामकाज सुरळीत ठेवण्यात यश मिळवले आहे.अशी माहिती जेएनपीए च्या जनसंपर्क कार्यालया द्वारे देण्यात आली आहे.



जेएनपीए येथील आयात कंटेनर थांबण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या सुधारला असून, तो फेब्रुवारी २०२६ मधील २५.१७ तासांवरून मार्च २०२६ मध्ये २२.६८ तासांपर्यंत कमी झाला आहे, जे वाढलेली माल हाताळणी कार्यक्षमता आणि सुव्यवस्थित प्रक्रिया दर्शवते. डायरेक्ट पोर्ट डिलिव्हरी (डीपीडी) आणि डायरेक्ट पोर्ट एन्ट्री (डीपीई) यांसारख्या कार्यक्षमतेवर आधारित उपक्रमांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षात अनुक्रमे ७४.५७% आणि ४५.७४% कामगिरी नोंदवत मजबूत कामगिरी कायम ठेवली आहे, ज्यामुळे मालाची जलद हालचाल आणि गर्दी कमी होण्यास मदत झाली आहे.

सरासरी टर्नअराउंड वेळ २२.६१ तास आहे, जी आव्हानात्मक परिस्थितीतही जहाज हाताळणीची उत्कृष्ट कामगिरी राखण्याची जेएनपीएची क्षमता अधोरेखित करते. ट्रान्सशिपमेंट कंटेनर हाताळणीत लक्षणीय वाढ होऊन त्याचे प्रमाण ५% वरून १६% पर्यंत गेले असतानाही जेएनपीएने कार्यक्षमतेची पातळी कायम राखली आहे. जेएन पोर्टमध्ये सध्या पुरेशी साठवण क्षमता उपलब्ध असून, कंटेनर साठवण क्षमतेपैकी केवळ सुमारे ५०% जागा वापरात आहे. याशिवाय, निर्यात कंटेनर साठवणुकीसाठी बंदर परिसरात अतिरिक्त ९.२ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, रीफर कंटेनरची वापरक्षमताही सुमारे ५०% इतकी आहे.

जेएनपीएने एक समर्पित कार्यदल स्थापन करून, टर्मिनल ऑपरेटर आणि हितधारकांशी सतत समन्वय साधून, आणि प्रत्यक्ष कार्यान्वयन देखरेखीद्वारे सक्रियपणे प्रतिसाद दिला आहे. ट्रॅक्टर ट्रेलरची 'बॅक टू टाऊन' (बीटीटी) वाहतूक, मालाची तात्पुरती पुनर्वाहतूक आणि इतर गर्दी कमी करण्याच्या उपक्रमांसारख्या लक्षित उपायांमुळे कार्यान्वयन स्थिरता सुनिश्चित झाली आहे.

# नवी मुंबई विमानतळावर तिसऱ्या धावपट्टीसाठी तयारी

## सिडकोकडून राईट्स क्रिएटीव्ह ग्रुपची सल्लागार म्हणून नियुक्ती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या हवाई प्रवासी मागणीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) येथे तिसऱ्या धावपट्टीच्या विकासासाठी तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सिडकोने राईट्स लिमिटेड आणि क्रिएटीव्ह ग्रुप एलएलपी (Joint Venture) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. हा अभ्यास सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

१५ एप्रिल २०२६ रोजी, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यासाबाबत महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. या श्रीमती. बैठकीस गीता पिल्लई, सीजीएम (टी अँड ए), सिडको; बिंदू मुरलीधरन, अतिरिक्त मुख्य परिवहन अभियंता, सिडको; अनिल असवानी, महाव्यवस्थापक, विमानतळ विभाग, राइट्स लिमिटेड; तसेच गुरप्रीत सिंग शाह, व्यवस्थापकीय संचालक, क्रिएटिव्ह ग्रुप एलएलपी उपस्थित होते.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मुंबई महानगर प्रदेशासाठीचे दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असून, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्यासह दुहेरी विमानतळ प्रणालीचा भाग म्हणून कार्यरत झाले आहे. देशातील सर्वात मोठ्या ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळांपैकी एक असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची संकल्पना प्रमुख राष्ट्रीय प्रवेशद्वार म्हणून करण्यात आली असून, पूर्ण क्षमतेनंतर दरवर्षी ९० दशलक्ष (MPPA) प्रवासी आणि ३.२ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळण्याची क्षमता यामध्ये विकसित केली जात आहे.

सुमारे १,१६० हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या या विमानतळात एकाच वेळी स्वतंत्रपणे कार्यरत राहू शकतील अशा दोन समांतर धावपट्ट्यांचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, पुढील दहा वर्षांत टप्प्याटप्प्याने विकसित होणारी चार टर्मिनल्सही प्रस्तावित आहेत.

प्रस्तावित व्यवहार्यता अभ्यासामध्ये तिसऱ्या धावपट्टीच्या विकासाची तांत्रिक, कार्यकारी, पर्यावरणीय आणि आर्थिक व्यवहार्यता सर्वंकषपणे तपासली जाणार असून, यामुळे प्रदेशातील विमानवाहतूक पायाभूत सुविधा अधिक बळकट होऊन दीर्घकालीन क्षमतेत लक्षणीय वाढ होण्यास मदत होईल.

## रीझनिंग ऑलिम्पियाडमध्ये सेंट मेरी स्कूलचे विद्यार्थी चमकले

**उरण : वार्ताहर**

सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात, सेंट मेरी कॉन्व्हेंट हायस्कूल, उरण येथे नोव्हेंबर २०२५मध्ये ब्लूम ऑलिम्पियाड परीक्षा झाली. या परीक्षेचे निकाल एप्रिल २०२६मध्ये जाहीर झाले.

यामध्ये इयत्ता पाचवीतील आराध्य मयुरेश पाटील याने रीझनिंग ऑलिम्पियाडमध्ये राष्ट्रीय स्तरावर सातवा क्रमांक मिळवत 'नॅशनल रायझिंग स्टार' पदक व प्रमाणपत्र प्राप्त केले. तसेच इयत्ता सहावीतील मास्टर अन्वय अमित म्हात्रे याने रीझनिंग ऑलिम्पियाडमध्ये राष्ट्रीय स्तरावर पाचवा क्रमांक मिळवत 'नॅशनल रायझिंग स्टार' पदक व प्रमाणपत्र प्राप्त केले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान एप्रिल २०२६मध्ये करण्यात आला. सत्कार समारंभ करण्यांत आला.

यावेळी सेंट मेरी कॉन्व्हेंट हायस्कूलच्या प्राचार्य सिस्टर मेरी कोनिकरा, पर्यवेक्षिका संगिता पाटील तसेच प्राथमिक विभागाच्या प्रभारी शिक्षिका वर्षा घरत यांच्या हस्ते पार पडला. आयोजनासाठी मार्गदर्शक शिक्षक म्हणून हर्षा केदार, कार्तिकी घरत, रुणाली ठाकूर आणि ऍग्नेस यांनी योगदान दिले.



# श्रीवर्धनमध्ये वाढत्या चोऱ्यांमुळे भीतीचे सावट

## बंदोबस्त करण्याची मागणी

**सध्या वाढत्या चोरीच्या घटनांमुळे श्रीवर्धन शहरातील नागरिक अधिक सतर्क झाले असून पोलिसांनी ठोस कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. शहरातील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनासाठी ही परिस्थिती मोठे आव्हान ठरत आहे.**



## नागरिकांचे पोलिसांना निवेदन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांनी अक्षरशः डोके वर काढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री अपरात्री अज्ञात चोरट्यांचा वावर वाढल्याने नागरिक अस्वस्थ झाले आहेत. अनेक ठिकाणी घरफोड्या, दरवाजे ठोठावण्याचे प्रकार आणि संशयास्पद हालचालींमुळे संपूर्ण शहरात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

गेल्या आठवड्यात विठ्ठल आळी परिसरातील सुरेश कर्णेकर यांच्या घरावर चोरट्यांनी डल्ला मारत दागदागिने आणि रोकड लंपास केली होती. या घटनेनंतर नागरिकांमध्ये भीती अधिकच वाढली. त्यानंतरही चोरट्यांची हालचाल सुरूच असल्याने अखेर संतप्त नागरिकांनी रविवारी (दि.१२) पोलीस ठाण्यात धाव घेत निवेदन सादर केले.

यापूर्वीही सुमारे पंधरा दिवसांपूर्वी साळीवाडा येथील एका चाळीत दोन खोल्यांचे कुलूप तोडून किरकोळ ऐवज चोरीला गेला होता. त्या घटनेपासूनच चोरीच्या सत्राला सुरुवात झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, रात्रीच्या वेळी काही अज्ञात व्यक्ती घरांची दारे ठोठावून नागरिकांना घाबरवण्याचा प्रयत्न करत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

शनिवार (दि.११) रोजी विठ्ठल आळी आणि बंदर गोठण परिसरात चोरट्यांनी पुन्हा एकदा धाडसी प्रयत्न केला. लोखंडी सळईसारखी साधने हातात घेऊन त्यांनी घरांचे दरवाजे जबरदस्तीने उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र घरातील व्यक्तींनी आरडाओरडा केल्याने शेजारी धावून आले आणि चोरटे डोंगराच्या दिशेने पळून गेले. या घटनेमुळे नागरिकांमध्ये दहशतीचं वातावरण अधिकच तीव्र झालं आहे.

दरम्यान, नागरिकांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी संबंधित भागात रात्रीची गस्त वाढवली असली तरी चोरट्यांचा वावर कायम असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. "चोरट्यांना आता पोलिसांची भीती उरलेली नाही," अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

शहरात श्रीवर्धन नगरपरिषदेकडून बसविण्यात आलेल्या सुमारे ९५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. काही कॅमेरे नादुरुस्त असल्याचे अधिकृतरित्या सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात अनेक कॅमेरे कार्यरत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. दुसरीकडे, नगरपरिषदेने आवश्यक त्या ठिकाणांचे फुटेज पोलिसांना उपलब्ध करून दिल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सीसीटीव्ही यंत्रणा हा सध्या वादाचा मुद्दा ठरत आहे.

# गो मातेला वाचवण्यासाठी जनआक्रोश मोर्चा

## विश्व हिंदू परिषद व बजरंग दलातर्फे आयोजन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात वाढत असलेली बेकायदेशीर गोहत्या आणि गोवंश तस्करी ही आपल्या सर्वांसाठी चिंतेची आणि संतापजनक बाब आहे. आपल्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या गोमातेचे रक्त आपल्याच मातीत सांडत आहे. गोहत्येच्या वाढत्या घटनांविरोधात आणि प्रशासनाचे डोळे उघडण्यासाठी विश्व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दल मुरूड तालुक्याच्या वतीने भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात तरुणी मुलीचा सहभागी झाल्या होत्या. यावेळी या मोर्चाला मुरूड पोलीस ठाण्या मार्फत आरसीपी व दंगल नियंत्रण पथक व पोलीस पथक १५० पोलिसांसह पाच अधिकारी यांचा कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश रसेडे, पोलीस मकरंद पाटील, ट्राफीक पोलीस नाईक किशोर बठारे आदी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सकाळी ११.३०च्या दरम्यान कल्याणी हॉस्पीटल आझाद चौक येथुन या भव्य जनआक्रोश मोर्चाला सुरुवात करण्यात आली. यावेळी शेकाडो कार्यकर्त्यांनी हातात जय श्रीरामाचे व राजे शिवछत्रपती महाराजांचे झेंडे घेऊन तसेच "देश का बल बजरंग दल","जय श्रीराम", "भारतमाता की जय","धर्मा रक्षति रक्षित,गौ माता की जय", "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय","जन्म जन्म नाता है गाय हमारी माता है" ,"ॐ नमो पार्वती पतये हर हर महादेव","हर हर महादेव, गो हत्या बंद"असे मजकुर लिहिलेले छोटे फलक घेऊन घोषणा देत आझाद चौक येथून नगरपरिषद कार्यालय, गणेश आळी नाका,मारुती नाका, दरबार रोड, तहसीलदार कार्यालया पर्यंत भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.



यावेळी विश्व हिंदू परिषद – बजरंग दल कार्यकर्तेनी मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांच्या कडे मुख्यमंत्र्यांना देण्यासाठीचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात असे म्हटले आहे की, अजामीनपात्र गुन्हा व शिक्षेत वाढ, सध्याच्या कायद्यात दुरुस्ती करून गोवंश तस्करी आणि हत्येशी संबंधित गुन्ह्यांना अजामीनपात्र करण्यात यावे. तसेच, अशा गुन्ह्यांसाठी किमान १० वर्षांच्या सश्रम कारावासाची तरतूद करण्यात यावी. मालमत्ता जप्तीची तरतूद जे गुन्हेगार वारंवार गोवंश तस्करीमध्ये आढळतात, त्यांच्यावर 'मोक्का' सारख्या कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी आणि त्यांची अवैध मार्गाने कमावलेली मालमत्ता जप्त करण्यात यावी., वाहन जप्ती व परवाना रद्द करणे तस्करीसाठी वापरण्यात येणारी वाहने कायमस्वरूपी जप्त करून, त्या चालकाचा व मालकाचा परवाना आयुष्यभरासाठी रद्द करण्याची तरतूद कायद्यात समाविष्ट करावी., विशेष पोलीस पथकाची स्थापना रायगड जिल्ह्यासाठी आणि विशेषतः मुरुड सारख्या किनारपट्टीच्या भागासाठी एक विशेष 'गोवंश संरक्षण पोलीस पथक तैनात करावे, जे केवळ अशा गुन्ह्यांवर लक्ष ठेवेल., गोशाळांना शासकीय अनुदान केवळ कायदे कठोर करून चालणार नाही, तर जप्त केलेल्या गोवंशाचा सांभाळ करणाऱ्या गोशाळांना शासनाने तातडीने आणि पुरेसे आर्थिक अनुदान उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून गोवंशाचे रक्षण सुलभ होईल.

मुरुड तालुक्यातील हिंदू समाज हा शांतताप्रिय आहे, परंतु गोमातेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. जर या कायद्यांमध्ये सुधारणा करून गुन्हेगारांना जरब बसवली नाही, तर संपूर्ण तालुक्यात तीव्र पडसाद उमटतील. आपण या मागण्यांचा विचार करून मंत्रिमंडळात यावर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

**प्रमुख मागण्या**

*मुरुडमधील सर्व अवैध कत्तलखाने तात्काळ कायमस्वरूपी बंद करा. गोवंश तस्करी करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई करा. गोवंश हत्या बंदी कायद्याची मुरुड तालुक्यात कठोर अंमलबजावणी करा.संशयित भागात आणि चेकपोस्ट वर पोलिसांची कडक गस्त वाढवा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.*



**खोपोली : विश्व हिंदू परिषदेच्या अखिल भारतीय सत्संगाचे प्रमुख दादा वेदक यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यांच्यासमवेत विश्व हिंदू परिषदेचे रूपेश मिस्त्री, रवींद्र जैन, लोखंडे, सुहास कुंभार, अशोक घोसाळकर, विजय घरत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह अविनाश मोरे, उपेंद्र करमरकर यांच्यासह हिंदू संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

# हरी भोसले यांची सल्लागारपदी निवड

**चौक : प्रतिनिधी**

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेचे नेते हरी भोसले यांची कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघाच्या विशेष ज्येष्ठ सल्लागार पदी निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हरी भोसले हे खालापूर तालुक्यातील आडोशी वडविहीर गावचे रहिवाशी असून ते ग्रुप ग्रामपंचायत वावरले या ग्रामपंचायत चे उप सरपंच होते. अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघ रायगड जिल्हा सचिव म्हणून देखील त्यांनी काम केले असून कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. मालदेव येथे झालेल्या सामाजिक परिषदेमध्ये नवनिर्वाचित अध्यक्ष बळीराम गणपत शिंदे यांनी त्यांची निवड घोषित केली.

अनुभवसंपन्न,सर्वसमावेशक व परवड विचार, त्यांचे मौलिक मार्गदर्शन संघाच्या कार्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास अध्यक्ष बळीराम शिंदे यांनी व्यक्त केला.

# नवतरुण मित्र मंडळातर्फे महामानवाची जयंती

**चौक : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत चौक येथील नवतरुण मित्र मंडळ यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती चौक नवीन वसाहत येथील नवतरुण मित्र मंडळ यांचे अध्यक्ष स्वप्नील सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय उत्साहात साजरी झाली. यावेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. इयत्ता दहावी, बारावी व पदवीधर यांचा सन्मान करण्यात आला. समाजासाठी कार्यरत असणाऱ्या कार्यकर्ते, संस्था यांचाही सन्मान आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला.



खोपोली येथील हेल्प फाऊंडेशन आणि अपघातग्रस्त यांना मदत करणारी संस्था यांचाही सन्मान आमदार महेश बालदी यांनी केला. समाजातील चांगल्या उपक्रमाबद्दल आणि सामाजिक भावनेने नवतरुण मित्र मंडळ कार्यरत असल्याने आमदार महेश बालदी यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, आर.पी.आय. चे तालुका अध्यक्ष महेंद्र धनगावकर आदी उपस्थित होते.

# भाजप नेते निलेश थोरेंची पक्ष कार्यालयास भेट

**नागोठणे : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण रायगड युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी मंगळवार दि. १४ एप्रिल रोजी नागोठणे येथील भाजप शहर कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत, त्या सोडवण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या भेटीदरम्यान तालुका मंडळ अध्यक्ष महेश ठाकुर, भाजप माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष निखिल मढवी, तालुका महामंत्री एकनाथ ठाकुर, आनंद लाड, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस मोरेश्वर म्हात्रे, विभागीय अध्यक्ष ज्ञानदेव शिर्के, शहराध्यक्ष गणेश घाग, अशोक अहिरे, धनराज उमाळे, विवेक रावकर, तीरथ पोलसानी, सुरेश जैन, मनोहर माळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# 'कास्ट्राईब'तर्फे महामानवाच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती रायगड जिल्हा परिषद अलिबाग व कास्ट्राईब संघटना यांच्या वतीने कुंटे बाग येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या विशेष कार्यक्रमासाठी कार्यालय सुंदररित्या सजवण्यात आले होते. रांगोळी व पुष्प यांची भारदार सजावट पहावयास मिळाली.



यावेळी कास्ट्राईब संघटनेच्या वतीने अध्यक्ष संजीव मोरे, के.सी. बागुल, कार्याध्यक्ष सचिन ओव्हाळ, कोषाध्यक्ष विकास बढे, सदस्य अशोक कूकलारे, सदस्य राजेंद्र गायकवाड, सदस्य रश्मी कांबळे, शंकर काथारा व इतर संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली. सर्व उपस्थित लोकांनी पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यात आली.

# तटकरे महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार यांनी अत्यंत प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणातून आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या कार्याचा गौरव केला. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने समाज परिवर्तन घडवून आणले," असे मत त्यांनी व्यक्त केले.



आपल्या भाषणात अरुण पवार यांनी आंबेडकरांच्या जीवनातील काही ऐतिहासिक संदर्भही मांडले. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहा पूर्वी त्यांची माणगाव येथे पुलापलीकडील आमराईत सभा झाली होती, ही बाब त्यांनी अधोरेखित केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना गुरू मानणाऱ्या आंबेडकरांनी रायगड किल्ल्यावर जाऊन शिवरायांच्या समाधीचे दर्शन घेतले होते, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात २३ गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. तसेच रांगोळी व भाषण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार, प्राचार्य खामकर आणि प्रा. आचार्य यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# खालापूर पोलीस ठाण्यात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**चौक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी खालापूर पोलीस ठाण्यात साजरी केली, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

ते म्हणाले नुसते स्वातंत्र्य मिळून उपयोग नाही, तर विचाराचे स्वातंत्र्य, वागण्याचे स्वातंत्र्य, मानव म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वात मोठी राज्य घटना लिहून ती पूर्ण केल्याने आज आपण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य जगत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजात वावरणे अतिशय महत्त्वाचे असून त्यांच्या विचारांचे पाईक होणे गरजेचे आहे,जे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित होते. असे आवाहन उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी केले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना पोलिस उप निरीक्षक मोहन भालेराव यांनी खालापूर पोलीस ठाण्यात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सुंदर प्रतिमा लाऊन जयंती साजरी करण्याची प्रथा पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी सुरू केल्याने त्यांचे मनपुर्वक अभिनंदन केले, पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या सारखा अधिकारी मिळणे कठीण आहे, असे गौरव उदगार त्यांनी काढले.

कार्यक्रमास खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे, रसायनी पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर उपनगराध्यक्ष संतोष जंगम, हेल्प फाऊंडेशन चे गुरुनाथ साठेलकर आणि टीम,पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, चौक प्रभारी विशाल पवार, सपोनी.मोहन बहाडकर, परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, पोलीस कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गोरा कुंभार पुण्यतिथीनिमित्त पालखी

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम असलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे येथे संत शिरोमणी गोरा कुंभार यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारंपरिक वेशभूषा आणि पालखी सोहळा उत्साहात पार पडला.

या उत्सवाच्या आयोजनात स्थानिक कुंभार समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. आपल्या पूर्वजांची परंपरा भक्तीभावाने आणि कौशल्याने पुढे नेणाऱ्या या समाजामुळे संपूर्ण गाव विठ्ठल नामाच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर भक्तीमय झाले होते.

संत गोरा कुंभार हे वारकरी संप्रदायातील अत्यंत आदरणीय संत त्यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गालसुरे येथील कुंभार समाजाने पुढाकार घेऊन हा उत्सव आयोजित केला होता. विशेष म्हणजे, समाजातील बांधवांनी आपल्या हस्तकलेचा वापर करून फुलांनी सजवलेली पालखी अत्यंत नयनरम्य आणि आकर्षक बनवली होती. उत्सवाचे वैशिष्ट्य असलेल्या पारंपरिक वेशभूषेत अनेक ग्रामस्थ वारकरी रूपात सहभागी झाले होते, ज्यामुळे सोहळ्याला अधिकच शोभा आली.



कार्यक्रमाची सुरुवात पहाटेच्या भजनांनी आणि विठ्ठल नामाच्या जयघोषाने झाली. त्यानंतर श्री विठ्ठलाची मूर्ती पालखीत विराजमान करण्यात आली. ढोल-ताशांच्या कडकडाटात आणि लेझीमच्या तालावर निघालेल्या या पालखी सोहळ्यात आबालवृद्धांनी मोठा सहभाग नोंदवला. वेशभूषाधारी कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" आणि "संत गोरा कुंभार महाराज की जय" अशा घोषणांनी गालसुरे गावचा परिसर दुमदुमून गेला होता.

# सीएसकेचा केकेआरवर शानदार विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जने कोलकाता नाईट रायडर्सचा पराभव करत चेपॉकचा गड राखला आहे. केकेआरला या स्पर्धेतील चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे, तर सीएसकेचा हा स्पर्धेतील सलग दुसरा विजय आहे.

सीएसकेने दिलेल्या १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरुवात खराब झाली. फिन एलन १ धावा करत बाद झाला. यानंतर सुनील नरेन २४, अजिंक्य रहाणे २८ आणि अंगक्रिश रघुवंशीने २७ धावांचे योगदान दिले. रिंकू सिंग ६ धावा करून, तर कॅमेरू ग्रीन गोल्डन डकवर बोल्ड झाला. यानंतर रोव्हमन पॉवेल आणि रमणदीप सिंग यांनी अर्धशतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला,

## नूर अहमद ठरला गेमचेंजर



पण ते संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. केकेआरचा संघ २० षटकांत ७ बाद १६० धावाच करू शकला. सीएसकेकडून नूर अहमदने तीन, अंशुल कंबोजने दोन, तर खलील अहमद व अकील हुसैन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तत्पूर्वी केकेआरने प्रथम नाणेफेक जिंकत चेन्नईला फलंदाजीसाठी पाचारण केले होते. चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाड पुन्हा एकदा अपयशी ठरला व सात धावा करत बाद झाला. यानंतर संजू सॅमसन व आयुष म्हात्रेच्या जोडीने फटकेबाजी करून संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. संजू ४८ धावांवर बाद झाला, तर आयुष १७ चेंडूत सहा चौकार व दोन षटकारांसह ३८ धावा करत बाद झाला. मग डेवाल्ड ब्रेविसने २९ चेंडूत धटपट ४१ धावांची खेळी केली, तर सर्फराझने २३ आणि शिवम दुबेने १३ धावांचे योगदान दिले आणि संघाला २० षटकांत ५ बाद १९२ धावा केल्या होत्या. केकेआरकडून कार्तिक त्यागीने दोन, तर वैभव अरोरा, अनुकूल रॉय व सुनील नरेन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

# ढवळेपाडा आणि पुणे संघ भाजप खालापूर तालुकाध्यक्ष चषकाचे मानकरी

**खालापूर : प्रतिनिधी**

भाजप खालापूर तालुका अध्यक्ष चषक नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, माजी सरपंच प्रितेश मोरे यांच्याकडून करण्यात आले होते. यानिमित्ताने रायगडसह महाराष्ट्रातील व बाहेरील राज्यातील क्रिकेटपटूंची मांदियाळी चार दिवस बोरगाव येथे पहायला मिळाली. स्पर्धेच्या खुल्या गटात डिंग डाँग पुणे संघ आणि ग्रामीण गटात ढवळेपाडा संघ विजेतेपदाचे मानकरी ठरले.




या स्पर्धेत एकूण २४ संघानी नोंदविला होता. आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनीही उपस्थित राहत चौक बोरगाव विभागातील खेळाडूंसाठी क्रिकेट मैदान उपलब्ध करून देण्याचे आश्वासन यावेळी दिले. त्याचबरोबर आयएसपीएलचे अध्यक्ष सुरज सावंत गतवर्षीप्रमाणे उपस्थित राहिले.


ऑल इंडिया विभागात प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तो डिंग डाँग पुणे संघ. या संघास चार लाख रुपये व आकर्षक चषक, तर उपविजेत्या भिवंडी तालुका संघास दोन लाख रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण विभागात ढवळेपाडा संघाने विजेतेपद (दीड लाख रुपये व आकर्षक चषक) आणि बोनशेत संघाने (पंच्याहत्तर हजार रुपये रक्कम व आकर्षक चषक) उपविजेतेपद पटकाविले. ऑल इंडिया ओपनमध्ये उत्कृष्ट फलंदाज अमित नाईक उत्कृष्ट गोलंदाज आर्यन भोईर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक बिलाल शेख ठरला, तर मालिकावीर म्हणून एजाज कुरेशी याची निवड करून त्याला बाईक देऊन गौरविण्यात आले.

ग्रामीण विभागात झालेल्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट फलंदाज सुधीर केवने, उत्कृष्ट गोलंदाज प्रथमेश केवने, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक करण खटले ठरला, तर मालिकावीर म्हणून अर्जुन बांगारी याची निवड करून त्याला बाईक देऊन गौरविण्यात आले. याशिवाय इतर बक्षिसे देण्यात आली.

# मुंबई इंडियन्सला मोठा झटका; दुखापतीमुळे रोहित शर्मा बाहेर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६मध्ये संघर्ष करणाऱ्या मुंबई इंडियन्सच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. संघाचा अनुभवी सलामीवीर आणि स्टार फलंदाज रोहित शर्मा दुखापतीमुळे पंजाब किंग्सविरुद्धच्या आगामी महत्त्वपूर्ण सामन्याला मुकणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'हॅमस्ट्रिंग'च्या दुखापतीमुळे रोहितला या सामन्यातून विश्रांती घ्यावी लागली असून मुंबईसाठी हा एक मोठा हादरा मानला जात आहे.



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या मागील सामन्यात धावांचा पाठलाग करताना रोहितला ही दुखात झाली. फलंदाजी करत असताना दुसऱ्या डावातील सहाव्या षटकात रोहितला पायाच्या स्नायूंमध्ये (हॅमस्ट्रिंग) वेदना जाणवू लागल्या. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून तो 'रिटायर्ड हर्ट' होऊन मैदान सोडून बाहेर गेला होता. ही दुखापत किती गंभीर आहे आणि तो पुढील किती सामन्यांना मुकणार, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

यंदाच्या हंगामात मुंबई इंडियन्सची कामगिरी अत्यंत निराशाजनक झाली आहे. खेळल्या गेलेल्या चार सामन्यांपैकी तीन सामन्यांत संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. गुणतालिकेत खालच्या स्थानी असलेल्या मुंबईला विजयाच्या रुळावर परतण्यासाठी रोहितच्या अनुभवाची अत्यंत गरज होती, मात्र आता तोच संघात नसल्याने सलामीच्या जोडीसह मधल्या फळीवरही दडपण येणार आहे. दुसरीकडे प्रतिस्पर्धी पंजाब किंग्सचा संघ सध्या चांगल्या फॉर्ममध्ये असून त्यांनी चारपैकी तीन सामने जिंकले आहेत. एका सामन्याचा निकाल न लागल्याने सात गुणांसह पंजाब मजबूत स्थितीत आहे.

रोहित शर्माने आयपीएल २०२६मध्ये आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर चांगली कामगिरी केली आहे. त्याने चार सामन्यांत ४५.६६च्या सरासरीने आणि १६५.०६च्या प्रभावी स्ट्राईक रेटने १३७ धावा केल्या आहेत. यात १३ चौकार आणि आठ षटकारांचा समावेश आहे. एकूण आयपीएल कारकिर्दीचा विचार करता, रोहितने २७६ सामन्यांत ७१८३ धावा केल्या असून त्याच्या नावावर दोन शतके आणि ४४ अर्धशतके नोंदवलेली आहेत. अशा फॉर्मात असलेल्या खेळाडूची अनुपस्थिती मुंबईला महाग पडू शकते.

आयपीएल २०२६मधील २४वा सामना १६ एप्रिल रोजी मुंबईच्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडे स्टेडियमवर रंगणार आहे.

## केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेसाठी यंदाचा आयपीएल हंगाम हा एका वाईट स्वप्नासारखाच ठरतोय. केकेआरसाठी हंगामातील पाच सामने झाले तरी अजून एक विजय त्यांच्या पदरात पडलेला नाही. त्यातच आता कर्णधार रहाणेवर नियमांचे उल्लघंन केल्याप्रकरणी कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

चेन्नई सुपर किंग्ज संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात षटकांची गती कमी ठेवल्याप्रकरणी बीसीसीआयने अजिंक्य रहाणेवर कारवाई केली आहे. केकेआर कर्णधाराचे हे यंदाच्या हंगामातील आयपीएल कोड ऑफ कंडक्ट नियम २.२२चे पहिले उल्लंघन आहे. त्यामुळे त्याच्यावर १२ लाख रुपये दंड लावण्यात आला आहे.

## दमदार आमदार प्रीमियर लीग स्पर्धेत लक्ष्मी व्हिला साखर संघ विजेता




**अलिबाग : प्रतिनिधी**

वीर दमदार आमदार प्रीमियर लीग २०२६ या क्रिकेट स्पर्धेत लक्ष्मी व्हिला साखर संघाने विजेतेपद पटकावले. शंभूराजे वॉरियर्स कामार्ले संघ उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक मिहिर अँड तनिष्क स्पोर्ट्स झालखंड यांनी, तर चतुर्थ क्रमांक सेव्हन स्टार्स थळ या संघाने प्राप्त केला.

अलिबाग येथे आमदार महेंद्र दळवी यांच्या पुढाकारातून तलवार मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पाच दिवस रंगलेल्या या स्पर्धेत अलिबाग, रोहा आणि मुरूड तालुक्यातील क्रिकेट संघ सहभागी झाले होते. शेवटच्या दिवशी इंडिया विरुध्द महाराष्ट्र असा प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली होती.

स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे हा या स्पर्धा आयोजनामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## 'कँडिडेट्स' स्पर्धेत सिंदारोव विजेता

### गुकेशविरुद्ध खेळण्याची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक बुद्धिबळात युवकांचे वर्चस्व दिवसेंदिवस ठळकपणे अधोरेखित होत असताना यंदा जगज्जेतेपदाची लढतही दोन 'जेन झी' प्रतिस्पर्धांमध्ये रंगणार आहे. २० वर्षीय जावोखिर सिंदारोव याने सायप्रस येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या 'कँडिडेट्स' स्पर्धेचे जेतेपद पटकावत आता बुद्धिबळाच्या इतिहासातील सर्वांत युवा जगज्जेता भारताचा १९ वर्षीय दोम्माराजू गुकेश याला सर्वोच्च किताबासाठी आव्हान देण्याची संधी मिळवली आहे.

उझबेकिस्तानच्या सिंदारोवने जगज्जेतेपदाचा आव्हानवीर ठरवणाऱ्या 'कँडिडेट्स' स्पर्धेत वर्चस्व गाजवताना एक फेरी शिल्लक असतानाच जेतेपद पटकावले. त्याने १३व्या फेरीत अनिश गिरीला बरोबरीत रोखले आणि गुणतालिकेत अन्य प्रतिस्पर्धी आपल्याला गाठू शकणार नाहीत हे सुनिश्चित केले. दोन वर्षांपूर्वी पदार्पणातच 'कँडिडेट्स' जिंकणाऱ्या गुकेशच्या कामगिरीची यंदा सिंदारोवने पुनरावृत्ती केली. विशेष म्हणजे आता तो गुकेशविरुद्धच खेळेल. आता नव्या दमाच्या अलौकिक प्रतिभेच्या या खेळाडूंमधील जागतिक अजिंक्यपद लढतही चुरशीची होईल असे मानले जात आहे.

# उरण येथे क्रिकेट नियमांतील नवीन बदलांवर मार्गदर्शन शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने (एमसीसी) नुकतेच क्रिकेट खेळतील नियमांमध्ये बदल केले आहेत. याच नवीन नियमांसंदर्भात मार्गदर्शन शिबिराचे आयोजन उरण क्रिकेट पंच असोसिएशनच्या वतीने २४ मे रोजी उरण म्हातवली येथील मातोश्री हॉलमध्ये करण्यात आले आहे. हे शिबिर एकदिवसीय असून सकाळी ९ ते ५ या वेळात होणार आहे.

क्रिकेट खेळतील बदलेल्या नियमांबरोबर आपल्याला स्पर्धेत पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरेदेखील या शिबिराच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत. शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून बीसीसीआयचे विद्यमान पंच तथा माजी रणजीपटू हर्षद रावले, एमसीएचे पंच राजन कसबे व क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा हे मार्गदर्शन करणार आहेत. एमसीसीच्या नवीन बदलेल्या नियमांमध्ये सात नियम हे नयन यांनी सुचविलेले असून ते एमसीसीच्या वतीने २०२६च्या आवृत्तीत अंतर्भूत करण्यात आले आहेत.

शिबिरामध्ये सहभाग घेण्यासाठी १० मे ही अंतिम तारीख असून प्रवेश फी ८०० रुपये आकारण्यात येणार आहे तसेच सहभागी होणाऱ्यांना नाश्ता व जेवणाची व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व क्रिकेट खेळाडू, प्रशिक्षक, पंच, गुणलेखक, आयोजक, समालोचक यांनी नव्या क्रिकेट नियमांची संपूर्ण माहिती मिळावी यासाठी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घ्यावा तसेच टेनिस बॉल, लेदर बॉल खेळणाऱ्या प्रत्येक संघाच्या कमीत कमी दोन खेळाडूंनी शिबिरात सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी उरण तालुका क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत माळी (९८३३०३८९९१) किंवा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पंच विघ्नहर्ता मुंढे (९८६७२०६२९७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उरण क्रिकेट पंच असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

# रा.फ. नाईक, टागोर नगर मित्र, ज्ञानशक्ती युवा, उत्कर्ष मंडळ, जय बजरंग संघांची विजयी सलामी

**ठाणे : प्रतिनिधी**

१०१व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या श्री मावळी मंडळाच्या ७३व्या राज्यस्तरीय महिला गट कबड्डी स्पर्धेत रा.फ. नाईक, टागोर नगर मित्र, ज्ञानशक्ती युवा यांनी विजयी सलामी दिली. उत्कर्ष मंडळ, जय बजरंग, वाशिंद यांना पहिल्या फेरीत विजय मिळविण्याकरिता ५-५ चढायांचा डाव खेळावा लागला.

स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. राज्य कबड्डी असोसिएशन आणि ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाण्यातील मावळी मंडळाच्या चरई येथील भव्य पटांगणावर सुरू झालेल्या महिलांच्या सामन्यात रा.फ. नाईक संघाने शताब्दी स्पोर्ट्सचा प्रतिकार ३४-३० असा मोडून



काढला. रेखा चिकणे, भारती शेळके यांच्या चढाई पकडीच्या खेळमुळे रा.फ. नाईकने पूर्वार्धात लोण देत २१-१४ अशी आघाडी घेतली, पण उत्तरार्धात शताब्दीच्या नंदिनी मौर्या, अनघा गायकवाड यांनी आपला खेळ गतिमान करीत लोणची परतफेड करीत सामन्यात चुरस निर्माण केली, मात्र संघाला विजयी करण्यात त्या अपयशी ठरल्या.

उपनगरच्या टागोर नगर मित्र मंडळाने ठाण्याच्या प्रेरणा कलाला २७-२३ असे नमवित आगेकूच केली. प्रतीक्षा भागवत, सायली फाटक यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. प्रेरणाच्या साधना जाधवने एकाकी लढत दिली. ठाण्याच्या ज्ञानशक्ती युवाने उपनगरच्या स्वस्तिक मंडळावर ४७-२८ अशी मात केली. विश्रांतीला दोन लोण देत २९-१४ अशी आघाडी घेणाऱ्या ज्ञानशक्तीने विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत आपला विजय सोपा केला. हिमानी गायकवाड, यतिक्षा बागडे, पौर्णिमा देवरे यांच्या झंझावाती खेळाने ज्ञानशक्तीला १९ गुणांच्या फरकाने विजय मिळविता आला. स्वस्तिकच्या दिव्या तिरवडकर, वनिता यादव चमकल्या.

पुरुषांच्या लढती पहिल्या फेरीपासुन चुरशीच्या झाल्या. उपनगरच्या उत्कर्ष मंडळाने ५-५ चढायांच्या डावात ठाण्याच्या विजय मंडळाला ४४-४३(६-५) असे चकवित आगेकूच केली. सुरुवातीपासून चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पहिल्या डावात २०-१८ अशी उत्कर्षकडे आघाडी होती, पण पूर्ण डावात विजयने ३८-३८ अशा बरोबरीत सामना आणला. ५-५ चढायांत मात्र उत्कर्षने बाजी मारली. शाम, रिकेश उत्कर्षकडून, तर स्मित पाटील, धीरज पाटील विजयकडून उत्कृष्ट खेळले. दुसऱ्या सामन्यात जय बजरंग वाशिंदने ५-५ चढायात उपनगरच्या मुलुंड स्पोर्ट्सचा ३५-३२(८-५) असा पाडाव केला. मध्यंतराला १४-११ अशी जय बजरंगकडे आघाडी होती. पूर्ण डावात मुलुंड स्पोर्ट्सने २७-२७ अशा बरोबरीत सामना आणला, पण ५-५ चढायात त्यांना विजयाची किमया साधता आली नाही. जय बजरंगने ८-५ अशी बाजी मारली.

श्री विठ्ठल मंडळाने श्रीराम कबड्डी संघाला ४३-२७ असे नमविले ते अक्षय मकवाना, कैस्तुभ पवार, सिद्धेश पांचाळ यांच्या चतुरस्त्र खेळामुळे. उपनगरच्या शूर जवानने चुरशीच्या लढतीत ठाण्याच्या नवरत्न मंडळावर ४५-४३ असा विजय मिळविला.

# आयर्लंड दौऱ्यासाठी वैभव सूर्यवंशीचा संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश

## सूर्यकुमारसाठी वैयक्तिक कामगिरी महत्त्वाची

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या ट्वेन्टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नावापुढे विश्वचषक विजेता कर्णधार असे बिरुद असले, तरी त्याचे भारतीय संघातील स्थान निश्चितपणे त्याच्या वैयक्तिक कामगिरीवर अवलंबून राहील असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळेच २०२८ लॉस एंजिलिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्याच्या समावेशाविषयी निश्चितपणे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्याचवेळी आगामी आयर्लंड दौऱ्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीला स्थान देण्यात आले आहे.



यावर्षी जून-जुलैमध्ये होणारा भारताचा इंग्लंड आणि आयर्लंड दौरा कर्णधार सूर्यकुमारसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल, कारण या वेळी त्याच्या नेतृत्वापेक्षा त्याच्या फलंदाजीची अधिक कडक छाननी केली जाईल असेच मानले जात आहे. दोन वर्षांनी २०२८मध्ये होणारी ऑलिम्पिक आणि ऑस्ट्रेलियातील ट्वेन्टी-२० विश्वचषक यांसारख्या मोठ्या स्पर्धांच्या पुढील टप्प्यापर्यंत त्याला आणखी दोन वर्षे संधी द्यायची की नाही याचा निर्णय या दौऱ्यातील कामगिरीवरून घेतला जाऊ शकतो.

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सूर्यकुमारलाच अजूनही पहिली पसंती दिली आहे. गंभीर यांचा कार्यकाळ २०२८च्या ट्वेन्टी-२० विश्वचषकापर्यंत वाढवला जाण्याची शक्यता आहे, मात्र अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती गंभीर यांच्या मताशी सहमत होईल का हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, कारण ऑलिम्पिकच्या वेळी सूर्यकुमार ३८ वर्षांचा असेल. संघात स्वतःचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी सूर्याला सातत्यपूर्ण कामगिरी करणे गरजेचे आहे.

## राज्यस्तरीय व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धा

# युवा पलटन, मध्य रेल्वे, एचएएल नाशिक संघांची आगेकूच

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा पलटन, मध्य रेल्वे, एचएएल नाशिक यांनी ओम् ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. मुंबईच्या आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लब मैदानावर ही स्पर्धा मॅटवर खेळली जात आहे.

अ गटातील पहिल्या साखळी सामन्यात युवा पलटनने स्वामी समर्थ स्पोर्ट्सचा ५७-२६ असा सहज पराभव केला. समोरच्या टिमचा अंदाज घेत खेळ करणाऱ्या युवा पलटनने विश्रांतीला २७-१६ अशी आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर मात्र टॉप गिअरवर पाय ठेवत सामना २९ गुणांच्या फरकाने खिशात टाकला. अभिषेक गुंगे, असलम इनामदार, वैभव



दाभाडे या विजयाचे शिल्पकार ठरले. स्वामी समर्थच्या अलताब मानसूख, प्रशांत पवार यांनी बऱ्यापैकी लढत दिली.

मध्य रेल्वेने क गटात रूपाली ज्वेलर्सचा ४६-१७ असा पाडाव केला. पूर्वार्धात आक्रमक खेळ करीत २७-१७ अशी आघाडी घेणाऱ्या रेल्वेने उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. श्रीकांत जाधव, विनोद अत्याळकर यांच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाला या विजयाचे श्रेय जाते. रूपालीच्या किशोर भोसले, गणेश मांजो यांचा खेळ सुमार होता. नाशिकच्या एचएएलने इ गटात जे.जे. रुग्णालयावर ४३-३१ असा विजय मिळविला. पहिल्या डावात दोन्ही संघाने १-१ लोण दिल्याने मध्यंतराला १८-१८ असा गुणफलक होता. दुसऱ्या डावात मात्र नाशिककरांनी तुफानी खेळ करीत विरुद्ध संघावर दोन लोण दिले आणि सामना १२ गुणांनी आपल्या बाजूने झुकविला. पवन भोर, साहिल बिले, भूषण सानप यांचा उत्तरार्धातील तुफानी खेळ या विजयात महत्वपूर्ण ठरला. जे.जे. च्या युवराज गवारे, आशिष वाघ यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com